|| जय माता जी ||

|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ५० सोमवार दि. ३० नोव्हेंबर २०२० ते रविवार दि. ०६ डिसेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

संकट काळातही महाविकास आघाडीच्या सरकारने वर्षपुर्ती केली

सरकार पाडण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपवाल्यांची फजिती झाली

मुंबई/वरिष्ठ प्रतिनिधी

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. या एक वर्षाच्या कालावधीत कोरोना सारख्या भयंकर महामारीचा मुकाबला करताना सरकारने निसर्ग चक्रीवादळ, अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तीनांही तोंड देत राज्याचा गाडा हळू हळू का होईना पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र अशा संकटाच्या काळात विरोधी पक्ष मात्र आंदोलने करून सरकारवर दबाव टाकीत होता. सरकारच्या कामात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होता. मुंबईला पाकव्याप्त काश्मीर म्हणणाऱ्या कंगना राणावत हिला झाशीची राणी म्हणून तिचा गौरव करीत होता. महाराष्ट्र द्वेष्ट्या अर्णब गोस्वामीसाठी थयथयाट करीत होता. सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरणात मुंबई पोलिसांवर विरोधी पक्षांकडून गंभीर आरोप केले जात होते. या सगळ्या गोष्टीचा अर्थातच सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रशासनाच्या कामकाजावर आणि पोलिसांच्या धैर्यशिलतेवर परिणाम होत होता. पण कुणीही संयम ढळू दिला नाही.

कोरोनाच्या या संकट काळात सरकार असो कि पोलीस प्रशासन प्रत्येकांनी आपले काम प्रामाणिकपणे केले. मात्र या संकटाच्या काळात महाराष्ट्रातील सरकारला इथल्या प्रशासनाला आणि जनतेला विरोधी पक्षाची म्हणजेच भाजपची अजिबात साथ मिळाली नाही. उलट विरोधी पक्षाने गेल्या वर्षभरात सतत सरकार पडण्याच्या तारखांवर तारखा देऊन पोकळ भविष्यवाणी केली. कोरोनाच्या संकट काळात विरोधी पक्षाची जबाबदारी सुद्धा सरकार इतकीच होती, पण सत्तेसाठी उचापत्या करण्याच्या घाणेरड्या राजकारणात विरोधी पक्ष त्यांची जबाबदारी विसरला. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारच्या वर्षपुर्तीवर बोलण्याचा आणि पत्रकार परिषदा घेऊन सरकारवर आरोप करण्याचा भाजपला नैतिक अधिकारच नाही, असे महाराष्ट्रतील जनता म्हणतेय.

लोकशाहीमध्ये सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षाचे असते. त्याचबरोबर जेंव्हा राज्यावर एखादे संकट येते तेंव्हा राजकारण बाजूला ठेऊन सरकारला मदत आणि मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सुद्धा विरोधी पक्षाची असते. सध्या महाराष्ट्रात भाजपा विरोधी पक्ष आहे. पण सरकार पाडणे हा त्यांचा एकच अजेंडा असल्याने कोरोना किंवा महाराष्ट्राच्या इतर समस्यांकडे त्यांचे लक्ष नाही. म्हणूनच ते कधी कंगनासाठी तर कधी ...पान ६ वर

देखणी प्रेयसी आयुष्यातून उठली प्रियकराने फसवून तिची अब्रू लुटली

जळगाव/क्राईम रिपोर्टर

आरोपी विजय

तारुण्यातील सौंदर्य आणि त्यातून परस्परांविषयी निर्माण झालेले आकर्षण यातून तरुण तरुणी एकत्र येतात आणि मग प्रेमाच्या नावाखाली वासनेचा खेळ सुरु होतो. तरुण मुली प्रियकराच्या साखर पेरणीला सहजपणे भुलतात आणि त्याच्यावर विश्वास टाकून त्याला सर्वस्व देऊन बसतात आणि त्यांच्या याच भाबडेपणाचा गैर फायदा घेत काही प्रियकर त्यांचे अश्लील फोटो किंवा व्हिडीओ बनवून त्यांना ब्लॅकमेल करतात. जळगावमध्ये एक सुंदर तरुणी ड्रायव्हरच्या प्रेमात पडली. मात्र त्याने तिचा गैरफायदा घेत तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि त्याचे व्हिडिओ बनवून तिला ब्लॅकमेक करू लागला. मात्र तिने नंतर या प्रकरणी पोलिसांकडे धाव घेऊन आपल्या प्रियकराच्या विरोधात फिर्याद नोंदवली.

विवाहीत कंगना दिसायला देखणी होती. तिचे रुप तरुणांसह वृद्धांना देखील मनोमन घायाळ करणारे होते. कंगना विवाहीत असली तरी तीचे घायाळ करणारे रुप एखाद्या टीन एजर अर्थात वयात आलेल्या तरुणीच्या तोडीस तोड होते. परमेश्वराने कंगनाला भरभरुन रुप दिले होते. मात्र या महागाईच्या जमान्यात तिच्या रुपाचा रखरखाव अर्थात मेटेनन्स ठेवण्याकामी ती काही प्रमाणात मागे पडली होती. हातच्या कंकनाला आरशाची काय गरज? या म्हणीप्रमाणे ती एक रुपगर्विता होती. सौंदर्य साधनांची आपल्याला फारशी गरज नाही असे म्हणत ती हल्कासा मेकअप करुन घेत होती. मात्र या हल्क्या मेकअप मधे देखील तिचे रुप उजळून निघत होते. व्यावसायीक मेकअप केल्यास ती एखाद्या सिने तारकेसमान खुलून दिसली असती. महागाईच्या जमान्यात घरखर्चाला हातभार लावण्यासाठी कंगना एका कंपनीत कामाला जात होती. तिच्यासमवेत इतर महिला देखील कामाला जात ...पान २ वर

एका महिन्यात हत्या झाल्या दोन मनसे नेत्यांच्या जीवावर उठलेय कोण

ठाणे/राजेंद्र वेदांते

राजकीय वादातून हत्या घडणे आजकाल निदान ठाणे शहरासाठी तरी नवीन नाही. कारण शिवसेनेच्या खोपकरांपासून मनसेच्या जमील शेखपर्यंत अनेकांच्या राजकीय वादातून हत्या झाल्या. पण सध्या मराठी माणसांसाठी आवाज उठवणारे मनसेचे नेते त्यांच्या राजकीय विरोधकांच्या टार्गेटवर आहेत. मनसेचे नेते राकेश पाटील यांच्या हत्ये पाठोपाठ ठाण्यात क्लस्टर डेव्हलपमेंटला विरोध करणाऱ्या मनसेच्या जमील शेख यांचीही हत्या झाली. मात्र पोलिसांना अजूनही मारेकरी सापडलेले नाहीत. त्यामुळे मनसे कार्यकर्त्यामध्ये असंतोष आहे.

ठाणे शहर हे उद्योजकांचे शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. परंतु महाराष्ट्र नवनिर्मान सेना या शहरात खूपच आक्रमक झाली होती. मनसेच्या नेत्यांनी आणि कार्यकत्यांनी आंदोलन, मोर्चा, निषेध हे कार्यक्रम हाती घेऊन विरोधकांची तारांबळ उडवली होती. त्यात मनसे नेत्यांचे काही दुश्मन ही तयार झाले होते.यातून वादावादीला ऊत आला होता. मनसे विरुद्ध इतर पक्ष असा संघर्ष पेटला होता.अलिकडच्या काळात शासकीय यंत्रणेला ही मनसे नेत्यांनी चांगलेच धारेवर धरले होते. मनसे म्हणजे सामान्य नागरिकांना न्याय ...पान २ वर

राधे राधे आश्रमात भलताच प्रकार घडला दहा कोटींच्या अफवेतून दरोडा पडला

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

कधी कधी कुंपणाच शेत खाते असे म्हणतात ते काही चुकीचे नाही. कारण आजवरचा गुन्हेगारीचा इतिहास पाहता हत्या अथवा दरोड्याच्या प्रकरणात काही घरभेदी लोकांचाच समावेश असल्याचे दिसून आले आहे. खास करून दरोड्याच्या प्रकरणात आपलेच लोक दरोडेखोरांना सामील असतात. पण कधी कधी चुकीची माहिती मिळाली तर काय घडू शकते हे औरंगाबादच्या फुलंब्री मधील राधे राधे आश्रमावर पडलेल्या घटनेतून दिसून आले आहे. या आश्रमात १० लाखांची रोकड आहे अशी टीप आश्रमातीलच कुणी तरी दरोडेखोरांना दिली. त्यामुळे दरोडेखोरांच्या टोळीने दरोडा तर टाकला पण त्यांच्या हाती काहीच लागले नाही. उलट प्रतिकार करणाऱ्या आश्रमाच्या महाराजांवर आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर विनाकारण हल्ला करावा लागला. मात्र नंतर पोलिसांनी या टोळीतील ९ जणांना अटक केली.

औरंगाबाद जिल्ह्यातील साताळा ता. फुलंब्री येथील राधे राधे या आश्रमात गेल्या ११ नोव्हेंबरच्या मध्यरात्री दोन वाजता प्रियशरण महाराजांवर जिवघेणा हल्ला झाला होता. आश्रमात दहा करोड रुपये असल्याची टीप या टोळीला कुणीतरी दिली होती. दहा करोड रुपये लुटीच्या उद्देशाने आलेल्या या टोळीने प्रियशरण महाराजांवर जिवघेणा ...पान २ वर

दारूच्या पार्टीत भलताच प्रकार घडला दारूड्या मित्राचा मित्रांनी मुदडा पाडला

गोवा/क्राईम रिपोर्टर

दारूची नशा एकदा का माणसाच्या डोक्यात गेली कि मग त्याला शुद्ध राहत नाही. अशावेळी मग समोर कुणीही असो तो कुणाचीही परवा करीत नाही. नातेवाईक असोत कि मित्रमंडळी दारूच्या नशेत तो कुणाचीही भाय भिडा ठेवत नाही. अशावेळी त्याच्या सोबत दारू पिणाऱ्या मित्रांसोबत शुल्लक कारणांवरुनही त्याचा मोठा वाद होऊ शकतो आणि या वादात मग पिणाऱ्यांपैकी कुणाचा तरी जीव जातो. गोव्यातील कुचेली येथे जामिनावर सुटून आलेल्या एका चोराचे दारूच्या पार्टीत त्याच्या मित्राशी भांडण झाले. या भांडणात तो मित्रांना शिवीगाळ करू लागताच मित्रांनी त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. ...पान २ वर

उधारीचा व्यवहार पूर्ण नाही केला वसुलीच्या वादात भंगारवाला मेला

वसई/क्राईम रिपोर्टर

उसने उधारीचे व्यवहार जर वेळेत पूर्ण केले नाहीत, तर त्यातून मोठे वाद निर्माण होतात आणि अशा वादात एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. कांदिवलीत राहणाऱ्या पारस गुप्ता यांच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. उधारीच्या पैशावरून झालेल्या वादात गुप्ता यांना आपला जीव गमवावा लागला. मात्र हा गुन्हा लपवण्याचा प्रयत्न आरोपींनी केला होता. पण वालीव पोलिसांनी तो हाणून पाडला आणि चारही आरोपींना अटक केली.

२२ नोव्हेंबर २०२० रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास पश्चिम द्रुतगती मार्गावरील बफाने ओव्हर ब्रिज नजीकच्या सर्विस रोड लगतच्या झुडपात पोलिसांना दोन पोत्यांमध्ये भरलेला एक मृतदेह सापडला होता. या प्रकरणी वालीव पोलिसांनी गु.र.क्र.१००६ नुसार कलम ३०२,२०१ अन्वये अज्ञात मारेकऱ्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर या तपासासाठी पोलिसांची तीन पथके तयार केली होती. सुरवातीला मुंबई, ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदर परिसरातील मिसिंग किंवा अपहरणाच्या प्रकरणांचा शोध घेऊन मृताची ओळख पटवण्यात आली. त्यानुसार मृत इसम हा कांदिवलीच्या समतानगरमध्ये ...पान ६ वर

मोक्ष प्राप्तीसाठी फासावर गेले भोंदू बाबासह तिघेजण मेले

शहापूर/क्राईम रिपोर्टर

देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष होऊन गेली, तरीही या देशाच्या ग्रामीण भागात आजही लोकं अंधश्रद्धेला बळी पडून एखाद्याचा जीव घ्यायला किंवा स्वतःचा जीव द्यायला तयार होतात. शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र हा पुरोगामी म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथे जुनाट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा यांना थारा नाही. दाभोळकर, पानसरे यांच्या सारख्या समाज सुधारकांनी समाजातल्या अंधश्रद्धांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जीवाचे रान केले. त्यांच्या सततच्या प्रयत्नांमुळेच येथे अंधश्रद्धा विरोधी कायदा अस्तित्वात आला. पण त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे आजही महाराष्ट्रात नरबळीचे प्रकार घडत आहेत.

ग्रामीण भागात आणि मुंबई सारख्या महानगरांमध्ये सुद्धा भोंदू बाबा दुकान मांडून बसलेत. त्यामुळे लोकं अंधश्रद्धे पासून दूर होण्याऐवजी तिच्या जवळ जात आहेत आणि त्यातून स्वतःचे नुकसान करून घेत आहेत. शहापूर नजीक मोक्ष प्राप्तीच्या आणि तंत्रविद्या शिकण्याच्या नावाखाली एका भोंदू बाबाने ...पान २ वर

ड्रायव्हरच्या हत्येचा प्लान केला भारी बाईने दिली एका बाईला हत्येची सुपारी

कासारवडवली/क्राईम रिपोर्टर

आजकाल पुरुषांपेक्षा महिलाही शातीर दिमाग निघाल्या आहेत. त्यामुळे एखाद्याला मार्गातून हटवण्यासाठी त्या सदर इसमाचा खून करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. मात्र कासारवडवली येथे एका महिलेने आपल्याच वाहन चालक कम प्रॉपर्टी केअर टेकरची हत्या करण्यासाठी दुसऱ्या एका महिलेला सुपारी दिली आणि तिने आपल्या साथीदारांच्या मदतीने त्या इसमाची हत्या केली. मात्र कासारवडवली पोलिसांनी मोठ्या शिथाफिने या हत्या प्रकरणाचा छडा लाऊन चारही आरोपींना अटक केली.

मालमत्तेसंबंधित काम पाहणाऱ्या तानाजी जावीर यांची हत्या याच महिलेने अन्य एका महिलेला एक लाख ४० हजारांची सुपारी देऊन केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जुलैमध्ये झालेल्या या हत्याकांडाची उकल करण्यात चार महिन्यानंतर कासारवडवली पोलिसांना यश आले असून या प्रकरणी दोन महिलांसह एकूण चार जणांना अटक करण्यात आली आहे. गेल्या १२ वर्षापासून बळीराम नागलकर यांच्या घरी तानाजी जावीर वाहनचालक म्हणून तसेच मालमत्तेची ...पान ६ वर

विरारमध्ये सव्वा चार कोटींची रोकड लुटणारे अखेर सापडले!

विरार/क्राईम रिपोर्टर

विरार पश्चिमेच्या बोळींज परिसरातील कोटक महिंद्र बँकेच्या एटीएमची कॅशव्हॅन लुटणाऱ्या टोळीला अटक करण्यात अखेर पोलिसांना यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी या लुटीतील तिघांना ताब्यात घेतले. विशेष म्हणजे यातील मुख्य आरोपीने चोरीच्या पैशातीन दीड लाखांची बुलेट घेतली होती. तीही पोलिसांनी जप्त केली असून त्यांच्याकडून १ कोटी ८८ लाख १९ हजार जप्त करण्यात आलेत. या आरोपींनी अत्यंत योजनाबद्धरित्या सव्वाचार कोटींची रोकड असलेली कॅशव्हॅन पळवली होती, पण अखेर ते सापडले. ...पान ६ वर

धान्याच्या धंद्यात त्याचे मोठे दिवाळे निघाले मालकाच्या मुलाचे खंडणीसाठी अपहरण केले

लातूर/क्राईम रिपोर्टर

लातूर पैशासाठी माणूस कोणत्याही ठरला जातो आणि चांगल्या मार्गाने जेंव्हा पैसा मिळत नाही आणि पैशाअभावी परिस्थिती बिकट बनते. तेंव्हा मग त्या माणसाची पावले गुन्हेगारीकडे वळतात. लातूर जिल्ह्याच्या कलमठ गावात राहणाऱ्या केरबा मुधले याच्या बाबतीतही तेच घडले. केरबाची आर्थिक स्थिती बिकट बनतीच त्याने आपल्या नातेवाईकांच्या मदतीने पूर्वी ज्याच्या दुकानात कामाला होता त्याच्या मुलाचेच खंडणीसाठी अपहरण केले. पण अपहरणकर्त्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी मजबूत फिल्डिंग लावल्याचे समजताच केरबाने पोलिसांच्या भीतीने मुलाला सोडून दिले. मात्र पोलिसांनी त्याला अटक करताच त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.

रेणापूर तालुक्यातील मौजे सांगवी, येथे एका घरासमोर खेळणाऱ्या ५वर्षीय चिमुकल्याचे अपहरण करून खंडणी मागण्याच्या बेतात आसलेल्या खंडणीखोराचा बेत पोलिसांच्या सर्तकतेमुळे फसल्याची कैतुकास्पद घटना...पान ६ वर

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:43 PM Page 1

पान १ वरून....

देखणी प्रेयसी आयुष्यातून उठली...

होत्या. त्या सर्व महिलांच्या समुहाला कंपनीत घेवून जाण्यासाठी व पुन्हा घरी सोडून देण्यासाठी कंपनीकडून वाहनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे कंपनीचे ठिकाण शहरापासून लांब असले तरी वाहनाची व्यवस्था असल्यामुळे ती कंपनीत कामाला जाण्यास सहज तयार झाली. दरमहा ठराविक पगार तिला मिळत होता. तसेच कंपनीत येण्याजाण्याची सोय देखील झालेली होती. एकंदरीत तिचे सर्वकाही सुरळीत सुरु होते. मात्र काही महिन्यांनी काही कारणास्तव कंपनीने ते वाहन बंद केले. वाहन बंद केल्यामुळे कंगनाची कंपनीत जाण्याची गैरसोय झाली. केवळ वाहन नसल्यामुळे नोकरी सोडण्याची तिची तयारी नव्हती कारण तिला ठराविक पगार वेळेवर मिळत होता. त्यामुळे तिने पर्यायी वाहनाचा शोध घेण्यास सुरुवात केली. लवकरच तिच्यासह इतर काही महिलांनी मिळून एका वाहन चालकाचा शोध लावला. तो वाहन चालक कंगनासह इतर महिलांना त्या नोकरी करत असलेल्या कंपनीत व कंपनीतून घरी सोडून देण्यास तयार होता. याकामी त्याला प्रत्येक महिलेकडून अकराशे रुपये मिळणार होते. सर्व महिलांनी मिळून ते वाहन भाडे तत्वावर लावून घेतले. कंगना आता ज्या वाहनाने कंपनीत ये जा करत होती त्या वाहनाचा चालक दिसायला रुपवान होता. कंगना देखील दिसायला एखाद्या सिनेनटीसमान होती तर तो वाहन चालक देखील दिसायला एखाद्या हिरोसमान होता. विजय ठाकुर असे त्याचे नाव होते. काळ्या गॉगलने नेत्र झाकल्यानंतर पिळदार बाहू असलेला विजय जणू काही फिल्मी हिरो समान दिसत असे. दिसायला सिनेनटीसमान कंगनावर विजय ठाकुर याचा जिव जडला होता. तिने आपल्या शेजारी स्टेरिंगजवळ बसावे असे तो मनोमन देवाला प्रार्थना करत असे. तिचे खुलून दिसणारे सौंदर्य त्याच्या मनाला भुरळ घालत होते. ती हसली म्हणजे तिच्या गालावर पडणारी खळी त्याच्या मनाला बेचैन करत असे. ती खाली वाकल्यावर तिच्या केसांची बट बघून तो कासावीस होत असे. एकंदरीत तो तिचा दिवाना झाला होता. त्याने हळूच तिच्यासोबत कोणत्या ना कोणत्या बहाण्याने जवळीक साधण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यात तो प्राथमिक स्वरुपात यशस्वी झाला. बोलतांना तिच्या गालावर खळी पडली म्हणजे तो स्वत:ला धन्य समजत असे. ती खळी जणू काही आपल्यासाठीच पडली असल्याचे तो मनोमन समजूत करुन घेत होता. तो तिला सरळ सरळ आय लव्ह यू म्हणू शकत नव्हता. तेवढे धाडस करणे रिस्की होवू शकते याची त्याला जाणीव होती. तिला आपल्या कवेत केव्हा घेवू असे त्याला होत असे. रात्री झोपेत त्याला न चुकता स्वप्न देखील पडत असे. स्वप्नात तो तिला दररोज कुरवाळत असे. स्वप्नात तो तिच्या गालांचे दररोज न चुकता चुंबन घेत असे. झोपेतून जागा झाल्यावर तो वास्तविक जगात अर्थात भानावर येत असे. कंगनाला आपल्या जवळ घेण्यासाठी त्याने जवळीक असलेल्या एका प्रवासी महिलेला मध्यस्त म्हणून तयार केले. ती मध्यस्त प्रवासी महिला त्याची मैत्रीण होती. त्यामुळे ती मैत्रीण आपली कंगनासोबत योग्य प्रकारे लाईन लावून देईल याची त्याला खात्री होती. त्या मैत्रीणीच्या माध्यमातून विजयने कंगनाला निरोप पाठवला. त्या मैत्रीणीने विजयच्या माध्यमातून कंगनाला म्हटले की विजय तुझ्यावर प्रेम करतो. त्याल तुझ्यासोबत मैत्री करायची आहे. तो तुला सर्व प्रकारची मदत करेल. तु नाही म्हणू नकोस. अशा प्रकारे लाडीगोडी लावून त्या मध्यस्त महिलेने कंगनाला विजयसोबत मैत्री करण्यासाठी राजी करुन घेतले. अशा प्रकारे मध्यस्त महिलेने विजय आणि कंगनाचे मैत्रीचे संयोजन जुळवून दिले. एके दिवशी त्या मध्यस्त महिलेने कंगनासाठी विजयचा निरोप आणला. आपण दोघी जणी विजयसोबत मार्केट मधे जाणार आहोत असे तिने कंगनाला कानात सांगितले. ठरल्यानुसार नटून थटून कंगना मार्केट मधे विजयसोबत जाण्यास तयार झाली. मात्र विजयचा प्लान वेगळाच होता. त्याने मार्केटमधे दोघींना न नेता एका लॉजमधे नेले. त्याठिकाणी त्याने त्याच्या मध्यस्त मैत्रीणीला बाहेर बसवून ठेवले. तो कंगनाला घेवून अगोदरच बुक केलेल्या रुममधे घेवून गेला. आतमधे गेल्यावर त्याने सुरुवातीला कंगनाला हळूच आपल्या कवेत घेतले. त्याठिकाणी त्याने एकांताचा फायदा घेत तिला निर्वस्त्र केले. त्याने सर्व प्रकारचे नियोजन अगोदरच करुन ठेवले होते. त्याने तिच्यासोबत अत्याचार करत त्या प्रसंगाचे व्हिडीओ चित्रण केले. शिवाय फोटोसेशन देखील केले. सुमारे दिड तास हा कार्यक्रम चालला. कंगनासोबत समागमाचा यथेच्छ उपभोग घेतल्यानंतर त्याने दोघींना आपापल्या घरी सोडून दिले. त्यानंतर कंगनाने तिच्या सहकारी महिलेला हा प्रकार कथन केला. त्यावर ती मध्यस्त महिला तिला म्हणाली की अग वेडी की खुळी.... तो तुझ्यावर प्रेम करतो. त्याला बळजबरी नाही म्हणत. अशा प्रकारे मध्यस्त महिलेच्या माध्यमातून विजयचे कंगनासोबत संयोजन जुळले होते. त्यामुळे तो तिला आता थेट बोलावून घेवू लागला. तो आता तिच्यासोबत थेट मोबाईलवर संपर्क साधू लागला. काही दिवसांनी त्याने तिला पुन्हा त्याच लॉजवर नेले. त्याने तिच्यासोबत पुन्हा तोच प्रकार केला. त्याने यापुर्वी तिचे नग्नावस्थेत काढलेले फोटो व व्हिडीओ तिला शेयर केले. तसेच तिच्यासोबत त्याने अश्लिल चॅटींग केली. या व्हिडीओ च्या बळावर तो आता तिला एक प्रकारे ब्लॅकमेल करु लागला. तो तिला वेळोवेळी बोलावून घेवू लागला. तो तिच्यासोबत समागम करु लागला. त्याने तिला विविध ठिकाणी त्याच्या कारमधून नेले व तिच्यासोबत शरीरसुख घेतले. कधी कधी त्याच्या कारमधेच त्याने तिच्यासोबत शरीरसुख घेतले. त्याचा हा अत्याचार तिला आता असह्य झाला होता. त्यामुळे तिने हा प्रकार सुरुवातीला काही नातेवाईकांच्या कानावर घातला. त्यानंतर नातेवाईकांना सोबत घेत तिने एमआयडीसी पोलिस स्टेशन गाठले. या घटनेबाबत तिने विजय उर्फ विक्की संजय ठाकुर याच्या विरुद्ध विविध कलमान्वये रितसर गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उप निरिक्षक गणेश कोळी यांच्याकडे देण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास तपास अधिकारी गणेश कोळी करत आहेत. (या कथेतील पिडीत महिलेचे कंगना हे नाव काल्पनिक आहे.)

एका महिन्यात हत्या झाल्या दोन...

मिळवून देण्याचे व्यासपीठ बनले होते. मनसेचा ज्वालामुखी उफळून येत असतानाच मनसे नेते राकेश पाटील यांची अत्यंत निर्घणपणे आणि निर्दयपणे हत्या करण्यात आली होती. या हत्येला एक महिना उलटत नाही तोच राबोडी भागातील मनसे नेते जमिल शेख यांची भररस्त्यात निर्घणपणे हत्या करण्यात आली. या दोन हत्येमुळे ठाणे शहरात प्रचंड खळबळ माजली आहे. या दोन्ही हत्येचा आतापर्यंत फक्त तपासच चालू आहे. या गुह्यातील मारेकरी अद्याप मोकाटच आहेत. मारेकरी पोलीसांना सापडत नाहीत. त्यामुळे आता तिसरी हत्या कूणाची या प्रश्नाची चर्चा सुरू झाली आहे. मनसेचे प्रभाग अध्यक्ष जमील शेख यांची दिवसाढवळ्या मोटारसायकलवरून आलेल्या दोघांनी गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना राबोडी परिसरात घडली. या हत्येप्रकरणी पोलिसांनी स्पष्टपणे बोलण्यास नकार दिलेला असून या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी सा.'क्राईम संध्या'शी बोलताना सांगितले. घटनेच्या दिवशी रात्री उशिरापर्यंत या प्रकरणात कुणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता. मात्र कसून तपासाअंती अज्ञात मारेकऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल करून पोलीसांनी तपासाला सुरुवात केली आहे. पोलीसांनी विविध पथके या हत्येच्या तपासात गुंतली आहेत. आम्ही लवकरच या गुन्ह्यातील आरोपींना पोलीस कोठडी दाखवू असा विश्वास तपास अधिकार्यांनी व्यक्त केला आहे.पोलीसांचे तपास पथक सीसीटिव्ही आणि माहितीगारांच्या मदतीने तपास करीत आहेत. मनसेचे प्रभाग अध्यक्ष जमील शेख यांची गोळ्या झाडून झालेली ही हत्या क्लस्टरच्या वादातून करण्यात आली असल्याचा आरोप ठाणे जिल्ह्याचे मनसेचे अध्यक्ष अविनाश जाधव यांनी केला आहे. अंबरनाथ येथे मनसेचे नेते राकेश पाटील यांच्या हत्येला महिना उलटत नाही तोच ठाणे शहरातील मनसे प्रभाग अध्यक्ष जमील शेख यांची अज्ञाताकडून गोळ्या झाडून हत्या केल्यामुळे ठाणे शहर हादरले आहे. ठाणे शहरातील मनसेचे राबोडी प्रभाग अध्यक्ष जमील शेख हे २३ नोहेंबर रोजी (सोमवारी) दुपारी नमाज अदा करून ठाण्यातील मनसेच्या पक्ष कार्यालयाकडे मोटारसायकल वरून जात होते. राबोडी मार्केट, जामा मस्जिद येथे मोटारसायकलवरून शेख यांचा पाठलाग करणाऱ्या दोघांनी त्यांच्या डोक्यात गोळ्या झाडल्या. त्यामुळे शेख मोटारसायकलवरून खाली कोसळले आणि तेथेच त्यांचा मृत्यू झाला. घटनास्थळावर पोलिसांना काहीही पुरावे मिळून न आल्यामुळे जमील शेख यांचा मृत्यू नक्की कशामुळे झाला याबाबत पोलिसांनी स्पष्ट माहिती दिलेली नाही. मात्र सीसीटीव्ही फुटेजमध्ये जमील शेख यांची हत्या स्पष्ट दिसत होती. जे.जे. रुग्णालयाकडून शेख यांच्या शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर त्यांच्या मृत्यूचे निदान होईल, अशी माहिती परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. जमील शेख यांच्यावर २०१७ मध्ये देखील हल्ला झाला होता. मात्र अद्याप या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी अटक केली नसल्याचे मनसेचे अविनाश जाधव यांनी सांगितले. जमील शेख यांचा ठाण्यात राबवण्यात येणाऱ्या 'क्लस्टर' योजनेला विरोध होता. त्यामुळेच त्यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप अविनाश जाधव यांनी केला आहे. घटनेचं सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागलं असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलीसांचे म्हणणे आहे. शवविच्छेदनासाठी जमील शेख यांचा मृतदेह मुंबईच्या जेजे रुग्णालयात पाठवण्यात आला आला आहे. तर दुसरीकडे घटनेचं सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागलं असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. जमील शेख यांच्या हत्येमागे राबोडीतील राजकीय नेत्यांचा हात आहे, असा थेट आरोप स्थानिक मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे याप्रकरणी पोलिसांकडून सर्व बाबींचा विचार करत पुढी तपास करण्यात येत आहे. दरम्यान मनसेच्या काही कार्यकत्यांनी आपले नाव न सांगता सा. क्राईम संध्याशी बोलताना सांगितले की काही राजकीय नेतेच ठाणे जिल्ह्यातील मनसेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत आहेत. राकेश पाटील आणि जमिल शेख या दोन हत्या मनसे नेत्यांवर दहशत बसवण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप या अधिकाऱ्यांच्या एका समूहाने केला आहे. या दोन हत्यामुळे ठाण्यातील मनसे कार्यकर्तामध्ये खळबळ माजली आहे.

राधे राधे आश्रमात भलताच प्रकार ...

हल्ला केला होता. मात्र बंदुकीचा आवाज आणि आरडाओरड झाल्यामुळे जिवघेणा हल्ला केल्यानंतर पळून गेलेल्या गॅंगला औरंगाबाद स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. अटकेतील सर्व नऊ जण सराईत दरोडेखोर आहेत. त्यांनी मध्य प्रदेशातील एका टोळीच्या मदतीने हा कट रचला होता. आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध सुरु आहे. आश्रमात १० कोटी रुपयांची रोकड असल्याची माहिती या टोळीला मिळाली होती. ती लुटण्यासाठी हा हल्ला करण्यात आला असल्याचा दावा पोलिस अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र असे असले तरी या आश्रमातून एकही वस्तू अथवा रक्कम चोरीला गेल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले नव्हते. राधेश्याम ऊर्फ राजा रामराव चिखले (३२) रा. परतूर, जि. जालना, ह.मु पुंडलिकनगर औरंगाबाद), बाळू बापू चव्हाण (४२) रा. परतूर ह.मु करोडी गायरान, वाळूज, बलवान चैनसिंग पवार (२५) रा. मुरदापूर, जि. गुणा, मध्य प्रदेश ह. मु वंजारवाडी, औरंगाबाद, भीमसिंग चैनसिंग पवार (३०) रा. मुरदापूर, जि. गुणा, ह. मु. वंजारवाडी, कुलदीप डडणसिंग ऊर्फ रुमालसिंग पारधी (२०) रा. मुरादपूर, मध्य प्रदेश, ह.मु वंजारवाडी, राजेश ऊर्फ भालकर विठ्ठल सोळंकी (२०) रा. करोडी, ह.मु सावंगी तुळजापूर शिवार खडी क्रशर परिसर, औरंगाबाद, हेमराज करणसिंग सोळुंकी (१९) रा. सावंगी तुळजापूर शिवार खडी क्रेशर परिसर, रामप्रसाद गणपत चव्हाण (३७) रा. नागनगाव, ता. जिंतूर, ह.मु पुंडलिकनगर, कृष्णा ऊर्फ बाळू धोंडिराम दहिवाळ (२५) रा. बाजी उमरद, जि. जालना, ह. मु. रामनगर, औरंगाबाद अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. हल्लेखोरांच्या अटकेसाठी पोलिसांवर मोठा दबाव होता. उपअधीक्षक विशाल नेहूल, निरीक्षक भागवत फुंदे, अशोक मुदीराज आणि संतोष खेतमाळस यांची एसआयटी स्थापन करण्यात आली होती. १५ दिवसांत सुमारे २०० लोकांची चौकशी करण्यात आली. साडेसहा हजार मोबाइल कॉल रेकॉर्ड तपासण्यात आले. मात्र हल्लेखोरांचा उद्देश कळत नव्हता. अखेर काही संशयित मोबाइल क्रमांकावरुन तपास केल्यानंतर पोलिसांना हे सराईत गुन्हेगारांचे काम असल्याचे समजले. टोळीतील दोघांच्या चौकशीनंतर एकेका संशयिताचे नाव समोर आले. शिवाय हा हल्ला पैशासाठी झाल्याचे समोर आले. घटनेच्या दिवशी चौका येथील एका दारुच्या अड्ड्यावर काही संशयित गाड्या या भरधाव जाताना दिसल्या होत्या. या वाहनांचे वर्णन संशयितांच्या वाहनांशी मिळतेजुळते असल्याचेही पोलिस सूत्रांनी सांगितले. आरोपींचा शोध लागत नसल्याने पोलिसांनी परिसरातील लोकांचीही कसून चौकशी सुरू केली होती. स्थानिकांकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात होते. ११ नोव्हेंबर रोजी रात्री दोनच्या सुमारास या टोळीने आश्रमात प्रवेश केला. कारमधून आलेल्या आरोपींनी गाड्या आश्रमाच्या खाली लावल्या. आत गेल्यावर महाराजांची खोली वगळता इतर दरवाजांना बाहेरुन कड्या लावल्या. दुसऱ्या दिवशी जयपूरला जायचे असल्याने महाराज रात्री एकच्या सुमारास सामान आवरुन झोपले होते. ज्या खोलीत हे दरोडेखोर पहिल्यांदा शिरले तिथे वृद्ध साधिका आणि इतर तिघे झोपले होते. दरोडेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. मात्र त्या साधिकेने प्रतिकार करत आरडाओरड केली. बाजूच्याच खोलीत असलेले महाराज तत्काळ बाहेर आले. महाराज आणि चोरट्यांमध्ये झटापट झाली. प्रतिकार करत महाराज बाहेर आले. त्यांचा पाठलाग करत आरोपींनी त्यांच्यावर चाकूहल्ला आणि लाठीने वार केला होता. महाराज व हल्लेखोरांची झटापट सुरु होती. त्यावेळी बंदुकीच्या फैरींसारखा आवाज झाला. पोलिस आल्याची भीती वाटल्याने आरोपींनी धूम ठोकली. या भागात रानडुकरांचे प्रमाण अधिक असल्यामुळे अनेक शेतकरी छऱ्यांच्या बंदुका ठेवतात किंवा जिलेटीनची कांडी ठेवतात. ही कांडी रानडुकराने चावली तरी आवाज येतो, अशी माहिती सूत्रांनी दिली. पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील, उपअधीक्षक विशाल नेहूळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक भागवत फुंदे, उपनिरीक्षक गणेश राऊत, संदीप सोळंके, सय्यद जिया, वसंत लटपटे, संजय देवरे, राजेंद्र जोशी, बालू पाथ्रीकर, नामदेव शिरसाट, विक्रम देशमुख, विठ्ठल राख, संजय काळे, प्रमोद खांडभराड, धीरज जाधव, श्रीमंत भालेराव, राजू खरात, नवनाथ कोल्हे, संजय भोसले, उमेश बकले, राहुल पगारे, शेख नदीम, किरण गोरे, दीपेश नागझरे, नरेंद्र खंदारे, वाल्मीक निकम, योगेश तरमाळे, ज्ञानेश्वर मेटे, बाबा नवले, गणेश गांगवे, रामेश्वर धापसे, जीवन घोलप, संजय तांदळे, सुरेखा वाघ, पद्मा देवरे, फुलंब्रीचे निरीक्षक अशोक मुदिराज आणि करमाडचे निरीक्षक संतोष खेतमाळस यांच्या पथकाने आरोपींना अटक केली. पोलिस पथकाने नऊ दरोडेखोर शिताफीने पकडून आणले असले तरी काही प्रश्न मात्र अनुत्तरित राहतात. हल्लेखोर लुटीच्या उद्देशान आले होते असे पोलिस सांगत असले तरी तसा चोरीचा अथवा लुटीचा कोणताही प्रयत्न झाल्याचे दिसून आलेला नाही. आश्रमात पैसे असल्याची अफवा नेमकी कुणी पसरवली आणि आश्रमाची खडान्खडा माहिती दरोडेखोरांना नेमकी कुणी दिली. आश्रमात अनेक साधकांबरोबरच अनेक कर्मचारी राहतात. हल्लेखोरांचा आवाज झाला तरी हे लोक जमा का झाले नाहीत. आरोपींची गाडीही कुणी पाहिली नाही. हल्लेखोर मराठीत बोलत असल्याचे महाराज सांगतात, मग परप्रांतीय टोळीचा सहभाग कसा? संशयितांमध्ये नऊ जणांची नावे आहेत. यापैकी प्रत्येकाला काम वाटून देण्यात आले होते. काही लोक फक्त गाडी पुरवतात तर काही लोक रेकी करतात. यापूर्वी शहरातील मोठ्या घरफोड्यांमध्येही यापैकी काही जणांचा समावेश होता. मध्य प्रदेशातील या टोळीला मूंछवाला सोलंकी गँग' असे म्हणतात. या टोळीतील सदस्यांचे नातेवाईक सध्या औरंगाबाद परिसरात राहतात. छावणी परिसरात डिलक्स बेकरीच्या मालकाच्या बंगल्यावर जो दरोडा पडला होता, त्यात या टोळीतील काही लोकांचा समावेश होता.

दारूच्या पार्टीत भलताच प्रकार घडला...

वडेश्वरनगर कुचेली येथे चंद्रकात शेटकर हे आपल्या कुटूंबासह राहयला होते. गेल्या एक दोन वर्षापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. त्यांची रिटायर शिक्षक म्हणून परिसरात ओळख होती. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहेत. त्याच्या मुलीचे लग्न झाले नसल्याने ती घरीच राहत होती. तर त्याचा मुलगा राजेश हा दारूच्या व्यसनाच्या आहरी गेल्याने वाहयात गेला होता. त्याचे लग्न होऊन दहा बारा वर्ष झाली तरी त्याला मुलबाळ झाले नव्हते. त्या नैराश्येतूनच त्याने दारूला जवळ केले होते. वयाची ५०शी आली तरी तो काही सुधारला नव्हता.कायम दिवस रात्र दारू पित असल्यामुळे तो काम धंदा मनात येईल, त्याच वेळी करत होता. आपल्या पोटापाण्यासाठी तो टॅक्सी चालवत होता. त्यातूनच त्याची ओळख ही गुन्हेगारी मित्राशी झाली होती. त्याच्या संगतीने तो ही लहान मोठया चोऱ्या करू लागला होता. एका चांगल्या सुंस्कृत शिक्षकाचा मुलगा वहयात गेल्याचे बघून अनेकांना वाईट वाटत होते. त्यातु वडिलांचे निधन झाल्याने घरात बहिण बायकोवर त्याचीच दादागिरी चालत होती. दारूच्या नशेत तो बायकोला मारहाण करून तिला ही तो त्रास देत होता. त्यामुळे ती ही त्याच्या त्रासाला वैतागलेली होती. काम धंदा न करताच तो घरात ऐतखाऊ म्हणून राहत होता. मनात येईल त्यावेळेस तो टॅक्सी चालवत होता. त्याचा त्रास हा त्याच्या बहिणाली आणि बायकोला होत होता. हल्ली तर तो दारू पिण्यासाठी बहिणीकडून बायकोकडून पैसे मागत होता. त्यांनी पैसे नाही दिले नाही तर तो घर डोक्यावर घेऊन हंगामा करत होता. वेळप्रंसगी तो त्यांना मारहाण ही करत होता. त्याच्या सासरवाडीच्या लोकांनी त्याला याबाबत बऱ्याच वेळेला समजावून सांगतिले होते. पण तो त्याचे ही काही ऐकत नव्हता. उलट दारू पिणाऱ्या आणि गुन्हेगारी, चोऱ्या मारामारी करणाऱ्या मित्रांच्या संगतीला लागून तो अधिकच बिघडत चालला होता. त्याच्या बायकोने ही त्याला सरळ वागा, चोऱ्या करू नका, दारू पिऊ नका म्हणून बजावले होते. पण त्याचे वागणे ही दिवसे दिवस बिघडतच चालले होते. कोरोनच्या काळात हाताला कामधंदा नसल्याने व लॉकडाऊन कडक केले गेले असल्याने दारू पिण्यासाठी त्याची तगमग वाढत होती. त्यासाठी तो काय वाटेल ते करत होता.म्हापसा येथे हॉटेल सत्यहिराच्या समोर पार्क केलेली एक दुचाकी त्याने गेल्या ऑक्टोंबर महिन्यात चोरली होती. या गुन्हयात पोलीसांनी त्याला गांधी चौक येथून ताब्यात घेऊन त्याच्या विरूध्द गुन्हा दाखल करून त्याला जेलमध्ये पाठविले होते. तो गेल्या दोन महिन्यापासून न्यायालयीन कोठडीत होता. त्याच्या सुटकेसाठी त्याची बायको बरेच प्रयत्न करीत होती.तिच्या प्रयत्नानेच गेल्या शनिवारी म्हणजे २१ नोव्हेंबरला त्याला जामीन मिळालेला होता.आणि तो बाहेर आला होता. तो बाहेर येऊन नुकतेच एक दोन दिवस झाले होते. जेलमधून बाहेर आल्यानंतर त्याला दारू पिण्याची जास्त इच्छा होत होती.म्हणून गेल्या रविवारी म्हणजे २२ नोव्हेबंर रोजी दारू पिण्यासाठी घरातून बहिणीकडून भांडण करून पैसे घेतले.पहिल्यदा त्याने बायकोकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले होते.परंतू भांडण करून ही तिने त्याला पैसे दिले नव्हते.तुमच्या जामीनासाठीच पैसे खर्च झाल्याचे सांगून तिने त्याला वाटेला लावले होते.त्यानंतर त्याने दारू पिण्यासाठी भांडण काढून आपल्या बहिणीकडून एक हजार रूपये घेतले होते.त्या भांडणातच तिने त्याला ते पैसे दिले होते. त्यानंतर तो संध्याकाळच्या सुमारास दारू पिण्यासाठी एका जवळच्या प्रार्थाना बार मध्ये गेला होता. तेथे अगोदरच त्या बारमध्ये त्याचे मित्र रूपेश महाले आणि सलीम नदाफ हे दारू पित बसले होते. त्यानी त्याच्या घशाखाली अगोदरच मोठया प्रमाणात दारू रिचवली होती. राजेश तेथे गेल्यानंतर त्याच्या पार्टीला रंग चढला होता.दारूचे पेग वर पेग रिचत होते. त्यातच बरेच दिवसांनी दारू पिल्यामुळे राजेशला जास्त नशा चढली होती. त्यातूनच त्याचे रूपेशबरोबर किरकोळ कारणातून वादावादीला सुरूवात झाली होती. तो त्यांना शिवीगाळ करू लागला होता. रूपेश आणि सलीम त्याला वाद न घालता त्याला समजावून सांगत होते. पण त्याचे नशे की बात खिशे म्हणून तो त्यांनाच दमदाटी करत त्याच्या अंगावर मारहाण करायला चालला होता. या भांडणाला मागील भांडणाची ही झालर होती. सलीम आणि रूपेश यांनी त्याला एका चोरीच्या गुन्हयात अडकवेले होते. त्याचा राग राजेश याला आलेला होता.तो त्यावरूनच त्याच्याबरोबर भांडण काढत होता. शेवटी त्या वादावादीतच ते तिघे ही त्या बारमधून नशेतच एकमेकाला शिवीगाळ करीत बाहेर पडले होते. बाहेर आल्यानंतर राजेशने परत रूपेशला परत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून मी आता जेल भोगून आलोय, माझे काय तुम्ही वाकडे करणार आहात म्हणून परत भांडणाला सुरूवात केली होती. त्यावेळी ते तिघे ही कुचेली येथील साई मंदिराजवळील निर्मनुष्य रस्त्यावर आले होते. त्यावेळी रात्रीचे ११ वाजले असतील रस्त्यावर कुणीच नव्हते. त्याचे भांडण वाढले होते. त्यावेळी रूपेश याने त्या भांडणात राजेश याला खाली पाडले. तर सलीम याने त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली. अगोदरच राजेश याला दारूची नशा जास्त झाली होती. त्याला झिंग चढली असल्याने त्या दोघांच्या मारहाणीत त्याला काहीच समजत नव्हते. तो आरडा ओरडा करू लागल्याने त्या दोघांना ही त्याचा राग आलेला होता. त्याला शिव्या देत मर रांडेच्या म्हणत रूपेश याने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि त्याच्या डोक्यात जोरात घातला. त्यासरशी त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त वाहू लागले. तो गंभीर रित्या जखमी झालेला होता. त्याला त्या अवस्थेत तसेच ओढत नेवून त्या दोघांनी त्याला तेथील झुडपात टाकले होते. आणि तेथेच त्यांनी त्याला जाळून टाकले. त्याला जाळून टाकल्यावर त्याचा मृतदेह जळाला किंवा नाही हे त्यांनी पाहीले नाही. आणि ते दोघे ही तेथून घटनास्थळावरून रात्रीच्या अंधारात कुणाला काही समजण्या अगोदर निघून गेले होते. त्याचा मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत होता. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या झुडपातून विव्हळण्याचा आवाज तेथील नागरिकांना येत होता. एका महिलेने त्या झुडपात डोकावून बघितले तर एक व्यक्ती गंभीर अवस्थेत कण्हत पडली असल्याचे दिसून आले. त्याचा पाय तिला हल्ल्यासारखा वाटत होता. म्हणून तिने त्या अर्धवट जळालेल्य व्यक्तीविषयी इतरांना सांगितले. त्यावेळेपासून इतरजण सकाळ पासून त्याला नुसतेच बघून जात होते. कुणाला तो ओळखीचा वाटत होता. तर कुणाला तो अनोळखी वाटत होता. दुपारी १२.४५ च्या दरम्यान या घटनेची माहिती म्हापसा पोलीसांना समजली होती. त्यांनी घटनास्थळी घाव घेऊन त्याची ओळख पटवली होती. त्याची ओळख राजेश शेटकर रा.कुचेली अशी पटली होती. पोलीसांनी त्याला उपचारासाठी १०८ रुग्णवाहिकेतून जिल्हा रुग्णालयात पाठवून दिले. ती ही रुग्णवाहिका तब्बल दोन तासांनी तेथे आली होती. परंतु तेथील डॉक्टरांनी त्याचा उपचारा पूर्वीच मृत्यू झाल्याचे पोलीसांना आणि त्याच्या घरच्या लोकांना सांगितले. घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक गजानान प्रभु देसाई, पोलीस निरीक्षक तुषार लोटलीकर, अधिक्षक शोवित सक्सेना यांनी भेट देऊन पाहणी करून तपासाच्या सुचना पोलीसाना दिल्या होत्या.या घटनेची माहिती पोलीसांनी मयत राजेश शेटकर याच्या पत्नीकडून घेतली होती. घटनेच्या दिवशी म्हणजे रविवार २२ नोव्हेंबर रोजी तो घरातून पैसे घेऊन दारू पिण्यासाठी बारमध्ये गेल्याचे पोलीसांना समजले. तेथील सीसीटिव्ही फुटेजच्या आधारावरून पोलीस संशयीत आरोपीच्या पर्यंत पोहचले होते. बारमधील सीसटिव्ही कॅमेऱ्यात राजेश शेटकर याच्याबरोबर आणखीन दोघे तरूण असल्याचे दिसत होते. या आधारेच पोलीसांनी संशयीत आरोपी रूपेश महाले याला कुचेलीतून तर सलीम नदाफ याला कांदोळीतून ताब्यात घेऊन त्यांना पोलीस स्टेशनला आणले. ते दोघे ही पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार होते. सलीमवर २०१७ सालात अपघाताचा आणि दंगलीचा गुन्हा नोंद झालेला होता. तर रूपेशवर ही काही गुन्हे नोंद होते. इकंदर सराईत गुन्होगारांनीच आपल्या मित्राला मागील भांडणाच्या कारणातून दारूच्या नशेत टपकवले होते. त्याच्याकडे पोलीसांनी मयत राजेश शेटकर याच्या खूनाविषयी चौकशी केली असता. ते दोघे ही सुरूवातीला पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्यानां पोलीसी खाक्या दाखविताच त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. त्यांनी गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी मयत राजेश शेटकर याच्या पत्नीकडून या घटनेची लेखी फिर्याद दाखल करून घेतली होती. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी राजेश चंद्रकांत शेटकर (वय ४९ रा.कुचोली, म्हापसा) याच्या खून प्रकरणी रूपेश महाले (वय ३२) आणि सलीम अब्दुल नदाफ (वय २४) या दोघांच्या विरोधात भादंवी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. पोलीसांनी त्या दोघांना म्हापसा येथील प्रथमवर्ग न्यायालयात दाखल केले असता मा.न्यायालयाने त्या दोघांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला होता. या घटनेचा योग्य रितीने तपास करून पोलीसांनी या गुन्हयातील दोघा ही संशयीत आरोपीना घटनेनंतर अवघ्या काही तासातच ताब्यात घेतले होते. या घटनेचा तपास उपनिरीक्षक अनिल पोवळेकर, अशिष परब, हवा.आल्विटो डिमेलो सुशांत चोपडेकर, शिवाजी शेटकर, इर्शद वाटांगी, शिपाई फ्रेन्की वाझ, राजेश कांदोळकर, अक्षय पाटील, देमगो माटणेकर, सर्वेश मांद्रेकर, अभिषक कासार, प्रकाश पोळेकर यांनी केला. पोटात अक्काबाई शिरली की शेळीचा वाघ होता. पण त्या नशेत तो स्वत:ला हरवून बसतो. आणि आपण कुणाबरोबर काय करतो आहोत याचे भान राहत नाही. नशेत भांडण उकरून काढले की त्याचे परिणाम वाईट होतात. आणि मग होत्याचे नव्हते होते हेच या घटनेवरून दिसून येते.

मोक्ष प्राप्तीसाठी फासावर गेले...

स्वतःसह चौघांना गळफास घ्यायला सांगितले. मात्र अचानक एकाच्या घरून त्याच्या मोबाईलवर फोन आल्याने तो घरी गेल्यामुळे बचावला. पण भोंदूबाबा आणि त्याचे अन्य दोन शिष्य मात्र फासावर लटकून मेले. या घटनेने संपूर्ण ठाणे जिल्हा हादरून गेलाय. शहापूर तालुक्यातील चांदा गावाजवळील जंगलात झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळलेल्या तीन मृतदेहांचे गूढ अखेर पोलिसांनी उकलले. तांत्रिक विद्येच्या प्रभावातून हा सर्व प्रकार घडला. याप्रकरणी फरार असलेल्या चौथ्या व्यक्तीला पकडल्यानंतर त्याच्या कबुलीजबाबातून हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सचिन कानकोचे असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी प्रा

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:43 PM Page 1

भिवंडीत मोबाईल आणि पैशांचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार!

बलात्कार प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे; आमदार रईस शेख यांची मागणी

भिवंडी/अभिजित हिरे

एका अल्पवीयन मुलीला मोबाईल व पैशांचं आमिष दाखवत पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. हि घटना भिवंडीतील समरुबाग परिसरात घडली आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात अपहरण, बलात्कारासह पॉक्सो कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करून दोघा नराधमांना अटक केली आहे. संतोष सोनी आणि इरशाद अन्सारी असे अटक आरोपींची नावे आहेत. दुसरीकडे हि घटना वाऱ्यासारखी परिसरात पसरल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली होती.

१६ वर्षीय पीडिता राहत असलेल्या परिसरातच आरोपी संतोष याची पानटपरी आहे. यामुळेच दोघांची ओळख होऊन पीडित मुलगी त्याच्या पानटपरीवर येत जात होती.त्यातच पीडित मुलीला पैसे तसेच मोबाईलचे आमिष दाखवत १२ नोव्हेंबर रोजी तिचे अपहरण करून आरोपीने तिला स्वतः च्या घरात कोंडून ठेवले होते. मात्र पीडित मुलीच्या वडिलांना माहिती पडताच त्यांनी आरोपीकडे मुलीविषयी विचारना केली असता आरोपी संतोष तसेच इरशाद अन्सारी यांनी धमकी देत वडिलांना हाकलून लावले.त्यामुळे पीडितेच्या वडिलांनी २१ नोव्हेंबर रोजी पोलीस ठाण्यात मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ मुलीचा शोध घेत मुलीला वडिलांच्या स्वाधीन केले.मात्र वैद्यकीय तपासणी केली असता मुलीसोबत अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले.यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून मंगळवारी रात्रीच्या सुमारास दोघांना अटक केली आहे. तर दुसरीकडे अल्पवयीन मुलीचं

अपहरण करून तिच्यावर बलात्कार झाल्याची घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि संतप्त जमावाने जातीय रंग देऊन अफवा पसरवत आरोपींचे असलेले हॉटेल व पानटपरीवर दगडफेक करून तोडफोड केली.जवळपास अर्धा तास चाललेल्या या तोडफोडीनंतर घटनास्थळी पोलिस उपायुक्त योगेश चव्हाण आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून परिसरात तणावाचे वातावरण आहे. सकाळी या परिसरात पोलिसांची गस्त वाढवण्यात आली असून दोन्ही आरोपीना बुधवारी न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.या गुन्ह्याचा अधिक तपास पो.नि.नरेश पवार करीत आहेत.

बलात्कार प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे – आमदार रईस शेख

भिवंडीत १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात दोघा नराधमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक देखील करण्यात आली आहे. दरम्यान पीडित मुलगी हि अल्पवयीन असल्याने या मुलीस व तिच्या परिवारास न्याय मिळवून देण्यासाठी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा तसेच त्याचा निकाल सहा महिन्यांच्या आत लावावा व पीडित मुलगी अल्पवयीन असल्याने तसेच तिचे पालक हे आरोपींच्या दहशतीखाली असल्याने या पीडित कुटुंबाला संरक्षण देण्यात यावे, पीडित मुलगी शिक्षण घेत असल्याने तिच्या शिक्षणाची जबाबदारी शासनामार्फत घेण्यात यावी व पीडित मुलीला केंद्र सरकारच्या महिला व बाल विकास विभागाच्या मनोधैर्य योजनेचा लाभ तसेच राज्य शासनाच्या संबंधित योजनांचा लाभ देण्यात यावा अशी मागणी भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे . दरम्यान आपल्या निवेदनाची दखल घेत गृहमंत्र्यांनी गृह विभागाचे उपसचिव व ठाणे पोलीस आयुक्तांना यासंदर्भात चौकशीचे आदेश देखील दिले असून एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून पीडित परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी आपण निश्चितच प्रयत्न करू अशी प्रतिक्रिया आमदार रईस शेख यांनी दिली आहे.

२९ गावांसंदर्भात लेखी सुचना व हरकती दाखल करण्याची १ डिसेंबरपर्यंत मुदत

पालघर/प्रतिनिधी

मा. उच्च न्यायालयाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यासाठी प्रस्तावित २९ गावांसंदर्भात त्या क्षेत्रातील सर्व घटकांसोबत व्यापक सल्लामसलत करुन तद्रंतर यथोचित अंतिम निर्णय घेण्याचे शासनास आदेश दिले आहेत. त्यानुसार शासनाने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच दिनांक २३/११/२०२० च्या पत्रान्वये Unit of dministration काय असावे? याबाबत देखील हरकती सुचना प्राप्त करुन योग्य अभिप्राय सादर करणेत कळविले आहे.

सद्यस्थितीतत कोव्हीड-१९ चा प्रार्दुभाव विचारात घेता प्रत्यक्ष सुनावण्या घेणे संयुक्तिक होणार नाही याकरीता प्रस्तुत क्षेत्रातील व्यक्ती, संस्था, लोकप्रतिनिधी इत्यादींना आपल्या लेखी हरकती, सूचना, निवेदने सादर करण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक असल्यामुळे वाढीव कालावधी देण्यात येत आहे.वसई विरार महानगरपालिकेतून २९ गावे वगळणे बाबतच्या हरकती सूचना बरोबरच संबंधित २९ गावे हि महापालिकेतून वगळल्यास, वेगळी झाल्यास Unit of dministration काय असावे म्हणजेच ती ग्रामपंचायतीच्या स्वरुपात रहावी अथवा त्यांची स्वतंत्र नगरपालिका व्हावी. याबाबत नागरिकांना हरकती, सुचना, निवेदने दाखल करणेसाठी खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चित केला आहे व अधिकारी यांना निर्देशित करण्यात येत आहे.

लेखी सुचना व हरकती दाखल करण्याचा कालावधी : २५ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर २०२० (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत).

सुचना व हरकती दाखल करण्याची ठिकाणे : १) उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसई जि.पालघर – उपविभागीय अधिकारी, वसई २) वसई-विरार शहर महापालिका, उपायुक्त यांचे कार्यालय, विरार – उपायुक्त, (सामान्य) वसई विरार शहर महानगरपालिका. ३) निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर – निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर. ४) प्रादेशिक उपसंचालक यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई. – प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन, कोकण विभाग. तरी या जाहीर सुचनेद्वारे आवाहन करण्यात येते की उक्त कार्यक्रमानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतुन २९ गावे वगळण्याबाबत तसेच गावे वगळल्यास Unit of dministration म्हणजेच पुन्हा ग्रामपंचायती ठेवाव्या अथवा स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी याबाबत देखील संबंधित इच्छुक व्यक्ती, संस्था, लोकप्रतीनिधी इत्यादी यांनी उपरोक्त नमूद ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत लेखी हरकती, सुचना, निवेदने सादर करावी.

संविधान दिनाचे औचित्य साधून नगरपंचतच्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

वाडा/प्रतिनिधी

संविधान दिना निमित्त वंचित बहुजन आघाडी आरोग्य समिती पालघर जिल्हा व रक्तकर्ण रक्तदाता ग्रुप वाडाच्या सयूंक्त विद्यमाने कोरोना काळात उत्कृष्ट पणे काम केलेल्या परंतु सन्मान पासून वंचित राहिलेल्या खऱ्या कोरोना योद्द्यांचा गुरुवारी (दि.२६) सत्कार करण्यात आला. वाडा नगरपंचायतीच्या सफाई कर्मचारी ते कार्यालयीन कर्मचाऱ्यांरी अशा एकूण ६० कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आले या प्रसंगी वाडा नगर पंचायत च्या नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर माजी उपनगराधक्ष्या उर्मिला पाटील वंचित बहुजन आघाडी पालघर जिल्ह्याचे उपाध्यक्ष डॉ सुनील भडंगे, सचिव सीताराम जाधव, युवा अधेक्ष अतिष जाधव आरोग्य समिती प्रमुख व रक्तकर्ण रक्तदाता ग्रुपचे अधक्ष प्रा. किरण थोरात रक्तकर्णचे सचिव राजेंद्र वाघचौरे, पत्रकार वैभव पालवे संजय लांडगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला व भारतीय संविधानाश पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले या प्रसंगी प्रस्ताविकेचे वाचन प्रा. किरण थोरात यानी केले व ते सर्वांनी ग्रहन केले. या प्रसंगी प्रास्ताविक प्रा. किरण थोरात यांनी केले. तर डॉ. सुनील भंडागे व नागराध्यक्ष गीतांजली कोळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात सर्व कर्मचारी यांचे सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

माध्यमिक शिक्षकेतर संघटनेच्या ठाणे जिल्हाध्यक्षपदी भरत जाधव बिनविरोध

भिवंडी/प्रतिनिधी

तालुक्यातील आठगाव विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय कोनगांव येथे आयोजित केलेल्या ठाणे जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेच्या जिल्हा वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठाणे जिल्हा शिक्षकेतर संघटनेच्या अध्यक्षपदी भरत नकुल जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या सर्वसाधरण सभेला महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेचे माजी अध्यक्ष एस.व्ही.डोंगरे, सभेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, कार्याध्यक्ष अरुण जाधव, कार्यवाह भरत जाधव, उपाध्यक्ष आर.एस.खैरनार, शरद धानके, कुणाल दोंदे, कोषाध्यक्ष रामदास म्हात्रे, उपकार्यवाह अतुल पाटील, हिशेब तपासनीस बबन वंजारी, राम पाटील आदी संघटनेचे पदाधिकारी व ठाणे जिल्ह्यातील शिक्षकेतर बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वार्षिक सर्वसाधारण सभेचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनेचे माजी अध्यक्ष एस.व्ही.डोंगरे यांनी कामकाज पाहिले. सदरची निवडणूक ही खेळीमेळीच्या वातावरणामध्ये बिनविरोध करण्यात आली. आगामी तीन वर्षाकरिता जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून त्यामध्ये अध्यक्ष म्हणून भरत जाधव, कार्याध्यक्ष आर.एस खैरनार, कार्यवाह अतुल पाटील, उपाध्यक्ष शरद धानके, कुणाल दोंदे, शांताराम आरोटे, कोषाध्यक्ष राजेंद्र पाटील, उपकार्यवाह सुनील अहिरराव, सिताराम शेळके, योगिता गोराडकर, हिशेब तपासणीस महेश भगत आदींची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटना ठाणे जिल्हा कार्यकारणीवर निवड झालेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनेचे माजी अध्यक्ष एस.व्ही. डोंगरे, मावळते अध्यक्ष प्रमोद पाटील, राम पाटील, अरुण जाधव, रामदास म्हात्रे आदींनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संघटनेचे माजी कार्यवाह भरत जाधव यांनी केले.

लातूर शहर स्वच्छतेसाठी महापालिकेची रात्रपाळी

लातूर/प्रतिनिधी

रात्रीची जेवणे झाली की आपण सर्वजण झोपण्याच्या तयारीला लागतो. त्यातही जेवण बाहेरच झाले असेल तर मग कशाचीही चिंता नसते. परंतु नेमक्या याच वेळी लातूर महापालिकेचे कर्मचारी बाहेर पडतात आणि शहरातील हॉटेल, विविध दुकाने, गॅरेज यांच्याकडे दिवसभर जमा झालेला कचरा एकत्रित करून त्याची विल्हेवाट लावतात. मध्यरात्र उलटेपर्यंत त्यांचे हे कार्य सुरूच राहते.

एका अर्थाने लातूर मनपाने आता कचऱ्यावर जागता पहारा ठेवण्यास सुरुवात केली आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी रात्रपाळी करत आहेत. लातूर शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्याचा विडा महानगरपालिकेचे उचलला आहे. शहरातील मुख्य रस्ते, खुले प्लॉट किंवा कुठेही कचरा पडून राहणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. घरोघर जाऊन कचरा वर्गीकरण करून स्वीकारला जात आहे. परंतु मुख्य रस्ते, बाजारपेठ किंवा विविध दुकानांमधील कचरा सकाळच्या वेळी संकलित करणे शक्य होत नाही. दुकाने सकाळी उघडलेली असतात. त्यावेळी त्यांच्याकडे कचरा नसतो. रात्री दुकाने बंद करताना व्यवसायिक दिवसभरात जमा झालेला कचरा रस्त्यावर टाकून निघून जात असत. हे लक्षात घेत महानगरपालिकेच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आले. व्यापारी आणि दुकानदारांशी चर्चाही करण्यात आली. त्यानुसार रात्रीच्या वेळी दुकाने बंद करताना या व्यावसायिकांकडून कचरा स्वीकारला जात आहे. महानगरपालिकेने त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे. याकरिता वाहने आणि कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे. दुकाने बंद करण्याच्या वेळी पालिका कर्मचारी आणि वाहन त्यांच्याकडे पोहोचते. या माध्यमातून हॉटेल चालकांकडून उरलेले व खराब झालेले अन्न तसेच विविध दुकानदारांकडे दिवसभर जमा झालेला कचरा संकलित केला जात आहे. पालिकेचे वाहन येइपर्यंत दुकानदारही थांबतात. एकत्र केलेला हा कचरा थेट डेपोवर पाठवला जातो. रात्री दीड ते दोन वाजेपर्यंत हे काम सुरू असते. त्यामुळे सकाळच्या वेळी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना शहरातील रस्ते, मैदाने आणि एकूणच शहर स्वच्छ आणि सुंदर दिसते. महापालिकेच्यावतीने सध्या शिवाजी चौक ते राजीव गांधी चौक, शिवाजी चौक ते पीव्हीआर चौक, शिवाजी चौक ते गंजगोलाई, शाहू चौक ते गरुड चौक आणि गंजगोलाई परिसरासाठी एक अशी पाच स्वतंत्र वाहने व कर्मचारी कचरा संकलनासाठी चालवली जात आहेत. अंबाजोगाई रस्त्यासाठीही लवकरच वाहन सुरू केले जाणार आहे. निवासी परिसरासह व्यवसायिक ठिकाणे आणि बाजारपेठांच्या परिसरातूनही नियमितपणे कचरा उचलला जात असल्यामुळे शहर अधिक स्वच्छ व सुंदर दिसत आहे.

जागतिक एड्स दिना निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

लातूर : जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक, कार्यालय लातूर मार्फत दिनांक १ डिसेंबर २०२० रोजी जागतिक एड्स दिना निमित्त महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई कार्यालयाच्या मार्गदर्शक सुचनानुसार एचआयव्ही/ एड्स जनजागृतीकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन १ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये कोवीड-१९ च्या मार्गदर्शक सुचनाचे पालन करुन करण्यात आले आहे. यामध्ये ऑनलाईन स्पर्धा एक मिनिटाचा प्रचारात्मक व्हिडीओ, जीआयएफ/मीम्स सेल्फी विथ स्लोगन, मास्क डिझाईनिग, ऑन लाईन व्याख्यान, सेल्फी विथ पोस्टर प्रदर्शन व अतिजोखीम गटाचे संवेदीकरण इ.कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा व तालुकास्तरावर करण्यात आलेले आहे. एचआयव्ही/ एड्स बाबत व्यापक जनजागृती मोहिमेमध्ये जास्तीत जास्त युवकांनी सहभाग नोंदवावा तसेच आपली एचआयव्हीची स्थिती जाणून घेणेसाठी आयसीटीसीमध्ये जावून एचआयव्ही तपासणी करुन घ्यावी.

थोडक्यात वृत्तांत

रेशनिंगचे धान्य काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या दोघांना अटक

भाईंदर : महाराष्ट्र शासनाच्या शिधावाटप दुकानात विक्री साठी असलेले साडेआठ टन धान्य काळ्या बाजारात विक्री साठी घेऊन जाणाऱ्या ट्रकला ताब्यात घेऊन दोन जणांना काशीमीरा पोलिसांनी अटक केली आहे. काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी सुरू असताना मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मुंबईहून गुजरात च्या दिशेने जाणारा एक ट्रक संशयास्पद वाटल्याने पोलिस पथकाने त्याची तपासणी केली असता त्यात ५०५० किलो गहू, ३४५० तांदूळ अशा गव्हर्नमेंट ऑफ पंजाब, मध्यप्रदेश,हरियाणा,व एक कदम स्वछता की और असे शिक्के असलेल्या महाराष्ट्र शासनाचे शिधावाटप दुकानासाठी असलेल्या धान्याच्या गोणी होत्या. त्याची किंमत १७ लाख ४५ हजार ५०० रुपये आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय हजारे यांनी चौकशी केली असता सदर धान्य काळ्या बाजारात विक्री साठी जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या प्रकरणात अत्यावश्यक सेवा अधिनियम कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करून दोन जणांना अटक केली आहे.

घरफोडी करणाऱ्या तिघांना अटक

भाईंदर : मीरारोड येथील हाटकेश भागात घरफोडी करणाऱ्या तीन जणांना पोलिसांनी अटक करून त्यांच्या कडून ६१ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. मीरारोड येथील हाटकेश भागातील संगीतकार श्रीकांत ठाकरे मार्गावर असलेल्या हरिया ड्रीम पार्क इमारतीतील तेजल ऍक्वा सर्व्हिसेस या दुकानात १५ दिवसांपूर्वी शटर तोडून चार वॉटर फिल्टर आरो पुरीफायरची चोरी झाली होती. पोलिसानी सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून अस्स्लम कादर सय्यद (३५), अहमद कादर सय्यद (३२), जावेद उर्फ मुन्ना शहा अशा तिघांना भारतीय दंड संहिता कलम ३८०, ४५४, ४५७, प्रमाणे अटक करून चोरी केलेला मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असा ९८ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

कामगारांना मोफत घरे देण्याची मागणी

भिवंडी : भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छता कर्मचारी शहराच्या स्वच्छते बाबत नियमित काळजी घेत असताना त्यांच्या साठी मोफत घरे देण्याचे दायित्व महानगरपालिकेने बाळगावे या साठी त्यांना मोफत घरे द्यावीत अशी मागणी नगरसेवक निलेश चौधरी यांनी केली आहे. विशेष म्हणजे त्यांचा हा विषय ३ डिसेंबर रोजी आयोजित सर्वसाधारण सभेत चर्चेला घेण्यात आला आहे. महानगरपालिकेत सुमारे २५०० सफाई कर्मचारी असून ते बहुसंख्य गरीब कुटुंबातील असून त्यांच्या साठी कोंबडपाडा, संगमपाडा, पद्मानगर या ठिकाणी निवास व्यवस्था आहे परंतु तेथे कर्मचाऱ्यांच्या वेतनातून घरभाडे कपात होत असून, तेथील निवासी इमारती अतिधोकादायक झाल्याने तेथील कर्मचारी यांना निवासाचा प्रश्न गंभीर बनला असून या कामगारांच्या निवासाची व्यवस्था महानगरपालिका कडून मोफत व्हावी अशी विनंती निलेश चौधरी यांनी सभागृहास केली आहे. दरम्यान येत्या ३ डिसेंबर रोजीच्या महासभेत लोकप्रतिनिधी व प्रशासन या मागणी संदर्भात काय निर्णय घेते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावेत

लातूर : लातूर तालुक्यातील २३४-लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील व २३५-लातूर शहर विधानसभा मतदार संघातील सर्व नागरिकांसाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिनांक १ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यांदीचे विशेष संक्षीप्त पुर्ननिक्षण कार्यक्रम सुधारीत वेळापत्रकानुसार दिनांक १७ नोव्हेंबर २०२० ते दिनांक १५ डिसेंबर २०२० या कालावधीत राबविण्यात येणार आहे. यामध्ये नविन नावे समाविष्ठ करणे तसेच ज्यांचे नाव मतदार यादीत नाही अशा नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करता येतील. तसेच मतदार यादीतील नावाची दुरुस्ती, नावांची वगळणी व ठिकाणात बदल याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. ज्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ठ करावयाचे आहे किंवा वगळावयाचे आहे किंवा दुरुस्ती करावयाचे आहे अशा नागरीकाकंनी याबाबत योग्य तो नमुना अर्ज (नमुना-६,७,८,८-अ) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी इङज यांचेकडून किंवा तहसिल कार्यालय, लातूर निवडणूक विभागातुन प्राप्त करुन घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी आपले नावे मतदार यादीत नोंदवावीत. असे आवाहन उपविभागीय अधिकारी, लातूर व तहसिलदार, लातूर यांनी केले आहे.

संविधान दिन उत्साहात साजरा



लातूर : राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिन हा सर्व भारतीय जनतेचा आत्मगौरव दिन आहे. अहिंसा, सहिष्णुता, मानवता, बंधुता, वैश्विकता हेच संविधानाचे वैशिष्ट्य आहे. घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक भारतीयांनी आत्मनिर्भर होण्यासाठी प्रत्येक कलमात भारतीयतेचा प्राण भरला आहे हे पदोपदी जाणवते म्हणून संविधान दिन हा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.यानिमित्त राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये प्राचार्य कर्नल एस ए वरदन यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संविधानाचे पूजन करण्यात आले. सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. जास्मिन शेख यांनी संविधानाचे महत्त्व सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी विक्रम माने, मुख्याध्यापिका विद्या साळवे, कॅप्टन बीके भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीदेवी नाडे यांनी केले तर नीता सुपलकर, विनोद चव्हाण, अमित होनमाळे, वर्षा नागिमे, हनुमंत थडकर, आदी शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:44 PM Page 1

महाविकास आघाडीची वर्षपूर्ती!

अठरा पगड पक्षांनी मिळून तयार केलेले आघाडी सरकार म्हणजे चलती का नाम गाडी रुक गया तो खटारा! अशातला प्रकार असतो. त्यामुळे असे सरकार चालले तर ५ वर्षांची टर्म ही पूर्ण करू शकते किंवा वाजपेयी सरकार प्रमाणे १३ दिवसांतही अशा आघाडी सरकारचा कारभार आटोपू शकतो. केंद्रात आणि गोव्यात हा संगीत खुर्चीचा खेळ अनेक वेळा रंगला होता आणि त्याने देशवासीयांचे चांगले मनोरंजन सुधा केले होते. कारण कोणाचे ६ महिन्याचे कोणाचे ११ महिन्याचे, कोणाचे १८ महिन्याचे तर कोणाचे १३ दिवसाचे सरकार आघाडी सरकारांचा हा बिन पैशाचा तमाशा भारतीय लोकशाहीसाठी नवा नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील तीन पक्षांच्या महाविकास आघाडी सरकारने एक वर्ष पूर्ण करून दाखवल हा एक चमत्कारच म्हणायला पाहिजे आणि असा चमत्कार करून दाखवणाऱ्या तिन्ही पक्षाच्या नेत्यांचा खरे तर शिवतीर्थावर जाहीर सत्कार करायला हवाय! महाविकास आघाडी सरकारची स्थापना आणि त्यासाठी रंगलेले पडद्यामागील नाट्य हा मसालेदार हिंदी चित्रपटांचा विषय ठरू शकतो. पण काय करणार आज मसालेदार चित्रपट बनवणारे मनमोहन देसाई आणि प्रकाश मेहरा हे दोन्ही दिग्गज दिग्दर्शक हयात नाहीत. अन्यथा महाविकास आघाडीच्या वर्षपूर्ती वर एक चांगला चित्रपट बनला असता आणि बॉक्स ऑफिसवर त्याने धमाल उडवली असती. असो राज्यातील महाविकास आघाडीच्या वर्षपूर्तीचा आढावा घेतल्यास त्यांचे वर्षभरातील कामं फार काही समाधानकारक होते असे म्हणता येणार नाही. पण ठीक आहे जे काही थोडेफार काम झालेय त्यात समाधान मानायचे की नाही हे आता महाराष्ट्रातील जनतेने ठरवायचे आहे. कारण सरकारचे सुरवातीचे काही दिवस तिन्ही पक्षातील नेत्यांचे मनोमिलन घडवण्यात गेले. त्यातच राज्य सभा आणि विधान परिषदेच्या जागा वाटप पासून ते काँग्रेसच्या मंत्र्यांना विकास निधी वाटपापर्यंत देण्यात आलेल्या सापत्न वागणुकीमुळे वर्षभर काँग्रेस नाराज आहे. काँग्रेस नेते पृथ्वीबाबा यांनी तर हे सरकार शिवसेनेचे आहे असे जाहीरपणे सांगून टाकले होते. मुख्यमंत्री शरद पवारांचे जास्त एकतात पण काँग्रेसला मात्र फारसे महत्त्व देत नाहीत हा आजही काँग्रेसचा आरोप कायम आहे आणि अशा परिस्थितीत सरकारची झालेली वर्षपूर्ती ही निश्चितपणे आश्चर्यकारक म्हणावी लागेल. कारण भाजपवाले कोर्टाच्या तारखा प्रमाणे रोज सरकार पडण्याच्या तारखा देत होते, पण त्यांची भविष्यवाणी काही खरी ठरली नाही. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते खुश आहेत. राहता राहिला प्रश्न गेल्या वर्षभरात महाविकास आघाडीच्या सरकारने काय काम केले? तर कोरोनाच्या संकटामुळे सरकारची अशी काही दमछाक करून टाकली होती की या संकटाचा सामना करता करता सरकारच्या नाकी दम आला. त्यातच लॉकडाऊनमध्ये राज्यातील उद्योगधंदे बंद असल्याने सरकारचे महसुली उत्पन्न सुद्धा ठप्प झाले होते. त्यातच सरकारवर साडेपाच लाख कोटींचे कर्ज आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठी सुद्धा कर्ज काढावे लागत होते आणि अशा परिस्थितीत आघाडी सरकार चालवायचे म्हणजे तारे वरची कसरत होती, पण ही कसरत कशी तरी पार पाडीत सरकारने एक वर्ष पूर्ण केले. या वर्षभरात काही जनहिताची कामे केली. यात महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत ३०.७७ टक्के खातेदारांना १९.६४३ कोटींचा लाभ मिळवून दिला. यावेळी खरीप पीक योजने अंतर्गत २७ टक्के अधिक कर्ज वाटप केले, तसेच विक्रमी कापूस खरेदी केली जी गेल्या १० वर्षांच्या तुलनेत अधिक आहे. तसेच प्रथमच रब्बी हंगामात भरड धान्य खरेदी केली. भरड आणि धन यांचीही विक्रमी खरेदी केली. या सरकारच्या काळात एका पाठोपाठ एक अशी अनेक संकटे आली. कोरोना बरोबरच गारपीट अतिवृष्टी, निसर्गचक्री वादळ ही सगळी संकट सरकार समोर असताना सरकारने या आपतीत नागरिकांना १३ हजार ३०० कोटीच्या निधीचे वाटप केले. गरिबांसाठी फायदेशीर ठरलेली शिवभोजन थाळी १० रुपया वरून ५ रुपये केली आणि सध्या ९०५ शिवभोजान केंद्रातून त्याचे वाटप सुरू आहे. ज्याचा २.५० कोटी लोकांनी लाभ घेतला. कोरोनाला आळा घालण्यासाठी सरकारने केलेलं काम निश्चितच उल्लेखनीय आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी या योजने अंतर्गत व्यापक जंबो कोविड सेंटर बनवले. त्यात चांगल्या सुविधा दिल्या. थोडक्यात कोरोनाच्या संकट काळात सरकारने केलेल्या चांगल्या कामामुळेच सध्या कोरोनाचा मृत्युदर आटोक्यात आहे. तर कोरोना रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढले आहे. या सर्वगोष्टी पाहता सरकारची कामगिरी अगदीच वाईट होती, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे हे सरकार तीन पक्षांचे असले तरी त्याची वर्षभरात केलेली कामगिरी फार चांगली नसली तरी वाईट सुद्धा नाही. आता विरोधक पत्रकार परिषदा घेऊन सरकारच्या नावाने बोंबलत आहेत. पण कोरोनाच्या संकटाच्या काळात या लोकांनी राज्यातील जनतेला किती मदत केली? हे एकदा सांगावे उलट महाराष्ट्राच्या, मुंबई पोलिसांच्या विरोधात गरळ ओकणाऱ्या लोकांना हे विरोधी पक्षाचे लोक मदत करीत होते. त्यामुळे सरकारच्या वर्षभरातील कामगिरीवर टीका करण्याचा त्यांना अधिकारच नाही. कोरोनाच्या संकट काळात आजारी माणसांना सुद्धा फडणवीस आणि त्यांच्या चेल्या चपाट्यांनी मदत केली नाही. सरकार कोरोनाशी दोन हात करीत असताना विरोधक आंदोलने करीत होते. त्यामुळे अशा बेजबाबदार विरोधी पक्ष सरकारच्या विरोधात बोलण्याचा नैतिक अधिकारच नाही. ते केवळ सरकार पडण्याची किंवा पाडण्याची प्रतीक्षा करीत आहेत. जेणेकरून त्यांना खुर्ची मिळेल, पण काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना राहिल्यास ५ वर्ष तरी सरकारला धोका नाही.

प्रेमात जिहाद कसला?

संध्या स्ट्रोक
सोनू जाधव

केंद्रात भाजपा प्रणित एनडीए आघाडीचे सरकार आल्यापासून कोणत्या ना कोणत्या कारणावरून जातीयवाद उफाळून येतोय. आणि त्यातून धार्मिक तणाव निर्माण होत आहेत जे देशाच्या अंतर्गत सुरक्षा आणि एकात्मतेला हानिकारक आहेत. सध्या लव्ह जिहाद विरोधी कायदा केला जात असल्याने देशात आणि खास करून उत्तर भारतात अशंतातेचे वातावरण पसरले आहे. मुळात लव्ह आणि जिहाद या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. लव्ह म्हणजे प्रेम ही एक तरल भावना आहे जी विश्वासाच्या, पायावर आणि भाव भावनांच्या बंधनात गुंफलेली असते. प्रेमात आदर असतो, परस्परांविषयीची ओढ आणि त्यागाची भावना असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेमाला जात, धर्म, पंथ, भाषा, आर्थिक विषमता, प्रांत, देश आदी कशाचीही मर्यादा नसते आणि म्हणूनच हिर रांझा, लैला मजनू, रोमियो ज्युलिएट यांच्या प्रेम कहाण्या जगात अजरामर ठरल्या. या उलट जिहाद म्हणजे हिंसा, दोन धर्म किंवा देशांमधील द्वेषातून निर्माण झालेली नफरत आणि धर्माच्या नावाखाली तरुणांना चिथावणी देऊन त्यांचं आयुष्य उध्वस्त करण्याची क्रूर मानसिकता यालाच जिहाद म्हणतात. त्यामुळे जो प्रेम करतो तो जिहादचा विचारही करू शकत नाही. पण हिंदू मुलीला लग्नाचं आमिष दाखवून तीच जबरदस्तीने केलेलं धर्मांतर किंवा आपला धर्म लपवून तिच्याशी ठेवलेले प्रेम संबंध याला आजकाल लव्ह जिहादचे नाव देण्यात आले आहे. कारण मुस्लिम तरुणांनी हिंदू मुलींना फसवून त्यांचं आयुष्य बरबाद करण्यासाठी काही तरुणांना मुद्दाम तयार केले जात आहे आणि हा सुद्धा एक प्रकारचा जिहाद आहे असे मुस्लिम तरुणांना वाटतेय आणि आजवर अनेक मुलींना अशा प्रकारे फसवून त्यांचे धर्मांतर करण्यात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. मात्र वल्लभ गड येथे दिवसा ढवळ्या खुलेआम घडलेल्या निकिता हत्याकांडाने लव्ह जिहाद पुन्हा चर्चेत आला. निकिताला तिच्या मुस्लिम प्रियकराने धर्मांतरासाठी दबाव टाकला होता. पण ती तयार झाली नाही म्हणून तिला गोळ्या घालून ठार मारण्यात आले. प्रेमात केवळ धर्मांसाठी प्रियकराने प्रेयसीला ठार मारणे ही संतापजनक बाब आहे आणि म्हणूनच बळजबरीने असे धर्मांतराचे प्रकार रोखण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने लव्ह जिहाद विरोधी कायदा आणला. केवळ उत्तर प्रदेशचे नाही, तर भाजपा शाशीत तब्बल दहा राज्यांमध्ये असा कायदा करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा या देशात जातीय तणाव निर्माण झाला आहे. मात्र असा कायदा करण्याने हिंदू-मुस्लिम तरुणी मधील प्रेम प्रकरणे आणि त्यानंतर होणारी धर्मातरे किंवा आंतरजातीय विवाह थांबणार आहेत का? तर अजिबात नाही! कारण प्रेम हे आंधळ असते ते जात धर्म बघत नाही अशा वेळी एखाद्या हिंदू तरुणी मुस्लिम तरुणाच्या प्रेमात पडली आणि तिने त्यांच्याशी लग्न केलं आणि त्यासाठी दोघांच्याही सहमतीने धर्मांतर झालं, तर कायदा त्यांना कसा काय अडवू शकतो. कारण दोगही जर बालिग असतील, तर कायद्यानुसार ते कुठल्याही जाती धर्माचे असोत. त्यांना लग्न करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मुस्लिम तरुणाशी लग्न करणाऱ्या हिंदू तरुणीला मुस्लिम समाजातील चालीरीती बाबत सर्व माहिती असूनही जर ती मुस्लिम प्रियकराशी लग्न करायला तयार झाली आणि नंतर तिची फसगत झाली. तर त्यात एकट्या त्या तरुणाला दोषी धरता येणार नाही. तर सगळ्या गोष्टी ठाऊक असतानाही मुस्लिम तरुणाशी लग्न करायला तयार झालेली ती तरुणी सुद्धा तितकीच दोषी आहे आणि हीच गोष्ट लव्ह जिहाद विरोधात आरडा ओरडा आणि कायदे करणाऱ्यांनी लक्षात ठेवायला हवी होती. लव्ह जिहाद प्रकरणात एकट्या मुस्लिम तरुणाला दोषी ठरवता येणार नाही, तर सगळ्या गोष्टी ठाऊक असूनही त्याच्याशी लग्न करणाऱ्या त्या हिंदू किंवा ज्या कुठल्या धर्माची ती तरुणी असेल तिचाही तितकाच दोष आहे. कारण टाळी एका हाताने वाजत नाही. त्यामुळे लव्ह जिहाद विरोधी कायदा कोणत्याही दृष्टीने समर्थनीय ठरू शकत नाही.

उलट अशा प्रकारचे कायदे आणले तर ते एका विशिष्ट धर्माला टार्गेट करण्यासाठीच करण्यात आलेत. असा एक मॅसेज जनतेत जाईलानी त्यातून हिंदू मुस्लिम समाजात आणखी तेढ निर्माण होईल. त्यातच आजची तरुण पिढी ही अत्यंत संवेदनशील आहे. त्यांना भडकावणारी एखादी छोटी ठिणगी सुद्धा मोठ्या जातीय वणव्याच रूप घेऊ शकते. तेंव्हा तरुण पिढीच्या भावनांशी खेळणारे कोणतेही चुकीचे कायदे देशातील कुठल्याही सरकारने करू नयेत. तसा पाहता आजची पिढी जात धर्म पाहत नाही. आजकाल शिक्षणाच्या नोकरी धंद्याच्या निमित्ताने तरुण मुले-मुली एकत्र येतात. त्यांचं प्रेम जुळत आणि मग ती लग्नाच्या बेडीत अडकतात. मात्र प्रेमात जात धर्म पहिला जात नसल्याने मोठ्या प्रमाणात सध्या आंतरजातीय विवाह होत आहेत आणि त्यात तरुण पिढी समाधानी आहे. त्या पिढी समोर लव्ह जिहाद सारखी प्रकरणे उभी करून त्यांना जातीयवादी बनवू नका तसे झाले तर ते खूप महागात पडेल.

मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३

जगाचा खात्मा करण्यात अग्रेसर एके ४७ रायफल

दिशायन

नुकतेच भारत आणि रशियामध्ये महत्त्वाचा करार झाला. या कराराप्रमाणे रशिया भारतात एके ४७ रायफलची निर्मिती सुरू करणार आहे. आजवरच्या अनेक युद्धांमध्ये, दहशतवादी हल्ल्यांमध्ये एके ४७ रायफल प्रभावी शस्त्र ठरले आहे. एके ४७ रायफल मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्यावेळी चर्चेचा विषय ठरली होती. तसेच १९९३ च्या साखळी बाँबस्फोटाच्यावेळी संजय दत्तच्या घरात ७१ एके ४७ च्या रायफल सापडल्या होत्या. त्यावेळीदेखील या राफयलविषयी चर्चा झाली होती.

मिखाईल क्लाशनिकोव या रशियाच्या मिलिटरी इंजिनियरने १९४१ पासून बंदुक आणि रायफल डिझाइन करण्यास सुरुवात केली. सोविएत युनियनला दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने वापरलेल्या एसटीजी ४४ पेक्षा अद्ययावत रायफल हवी होती. मग काय क्लाशनिकोव कामाला लागले. १९४६ मधे त्यांनी प्रायोगिक तत्त्वावर एक रायफल बनवली. पण त्यात अनेक त्रुटी असल्यामुळे त्यावर पुन्हा काम करून १९४७ ला एक नव्या रुपातली रायफल सैन्यदलासमोर ठेवली. सैन्याने या ही रायफल वापरण्यासाठी हिरवा कंदील दाखवला. त्यामुळे० ६ जुलै १९४७ पासून या रायफलची अधिकृत निर्मिती होऊ लागली.

रायफलला एके ४७ म्हणतात कारण, एके मधील ए म्हणजे ऑटोमॅट याचा अर्थ ऑटोमॅटीक असाच होतो. के म्हणजे क्लाशनिकोव हे रायफल बनवणाऱ्या इंजिनियरचे नाव आहे. तर ही रायफल १९४७ ला बनवण्यास सुरुवात झाली म्हणून ४७ होय, ही माहिती हिस्ट्री अँड हेडलाईनवर उपलब्ध आहे. संपूर्ण जगात एके ४७ ही रायफल मानवी इतिहासातली सर्वोत्तम आणि यशस्वी रायफल म्हणून ओळखली जाते. या रायफलचे मूळ स्वरुप म्हणजे त्याकाळी उपलब्ध असलेल्या सगळ्या चांगल्या रायफलमधील चांगल्या गोष्टींचे एकीकरण होय. त्याकाळातल्या एका रायफलीत हे चांगले होते तर दुसऱ्या रायफलीत ते चांगले होते. मग क्लाशनिकोव यांनी साधारण १५० रायफलींमधले चांगले पार्ट नव्याने बनवून ते असेम्बल केले, असा एके ४७ रायफलचा जन्म झाला.

ट्रिगर तंत्र, सेफ्टी कॅच, रोटेटींग बेल्ट आणि गॅसवर आधारीत रिलोडींग आदी या रायफलचे वैशिष्ट्य आहेत.

ही रायफल साधारण १५ हजार वेळा वापरता येते. यातून एका मिनिटात ४० ते १०० गोळ्या बाहेर पडतात. ज्या ३५० मीटरपर्यंत जातात. रायफलचे वजन फक्त ३.४७ किलो आहे, असं द इकॉनॉमिस्टने आपल्या एका रिपोर्टमधे नमूद केले होते. आता एवढी सगळी वैशिष्ट्ये असणारी रायफल खूप महाग असेल, असे वाटणे सहाजीक आहे. मात्र ही रायफल स्वस्त आहे. म्हणूनच हिचा वापर जगातल्या जवळपास सगळ्याच देशांमधे केला जातो.

ही रायफल काही फक्त सैन्यामुळे प्रसिद्ध झाली नाही. तर दहशतवादी हल्ल्यांमधेही हिचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. म्हणूनच ही रायफल वारंवार चर्चेत येते. फोर्ब्स मॅगझिनने मार्च २०१९ मधे एका लेखात दिलेल्या माहितीनुसार, एके ४७ रायफलचा काळा बाजार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे रायफलच्या अनधिकृत किंमतीत ५६ टक्क्यांनी वाढ झालीय. प्रत्येक देशात वेगवेगळ्या किंमतींना विकली जाते. सध्या ६०० ते २ हजार ८०० युएस डॉलरने रायफल विकली जातेय.

वर्षाला एके ४७ ची जगातल्या वेगवेगळ्या देशांमधे साधारण २० कोटींची अधिकृत विक्री होते. डुप्लिकेट रायफल बनवण्याचा बाजारही मोठा आहे. पण त्या रायफलमधे मूळ रायफलची वैशिष्ट्ये मिळत नाहीत. भारतात अधिकृतरीत्या बनवली जाणारी इंसास, कलांतक आणि इंसास लाइट मशीन गन रायफलही एके ४७ ची प्रतिकृती असल्याचे म्हटले जाते.

आपल्या वीडियो गेम, खेळणी, टिशर्ट, दारूच्या बाटल्या, गिफ्ट आर्टीकल इत्यादी ठिकाणी एके ४७ चे चित्र, आकृती पाहायला मिळते. म्हणजे या रायफलची लोकांमधेसुद्धा क्रेझ आहे. त्याचबरोबर बगदादच्या वस्तुसंग्रहालयात सद्दाम हुसेनची स्पेशल एके ४७ ठेवली आहे. महत्त्वाचे म्हणजे ही रायफल सैनिकांपासून, दहशतवाद्यांपर्यंत सगळ्यांच्याच हातात दिसते आणि सगळ्यांनाच आवडते.

या रायफलवर २००७ मधे मायकल होजेस या ब्रिटिश लेखकाने 'एके ४७: द स्टोरी ऑफ पीपल्स गन' नावाने एक पुस्तक लिहिले. हे पुस्तक ॲमेझॉन, गुगुल बुक, गुडरीडवर उपलब्ध आहे. पुस्तकात एके ४७ ही रायफल आणि रायफल बनवणारा कसा सोविएत युनियनचा हिरो ठरला याची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर संपूर्ण जगाचा खात्मा होण्यात ही रायफल केंद्रस्थानी आहे. ही रायफल दहशतवादाच्या हातातले अस्त्र असल्याचाही उल्लेख पुस्तकात आहे. तसेच या रायफलला सर्वव्यापी असेही म्हटले आहे. जगात तिसरी क्रांती होणार आहे म्हणतात. पण क्रांती करणाऱ्यांच्या हातात एके ४७ आहे, असे लिहून लेखकाने आपली चिंताही व्यक्त केलीय.

स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेची तीन तपे!

हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे नेते पू.बाबासाहेब परांजपे यांनी नारायणलाल लाहोटी, चंद्रकांत देऊळगावकर, जीवनधर शहरकर यांच्या साथीने स्थापलेल्या 'स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमाले३९; स तीन तपे-३६ वर्षे पूर्ण होत आहेत. प्रख्यात विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी २४ मार्च १९८५ रोजी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले. तेव्हापासून गेल्या ३६ वर्षात, व्याख्यानमालेने १५० नामवंत वक्त्यांचे विचार लातूरकरापर्यंत पोहोचवले. हरित क्रांतीचे अध्वर्यू-पद्मविभूषण डॉ.एम.एस.स्वामीनाथन, डॉ.अनिल काकोडकर, डॉ. जयंत नारळीकर यासारख्या वैज्ञानिकांनी संवाद साधला. समाजसेवक पद्मविभूषण बाबा आमटे, रजिया पटेल,फुद्दिन बेन्नूर, वर्षा देशपांडे, डॉ.अनिल अवचट, डॉ.राजेंद्र सिंह, विजय जावंधिया यांनी बदलत्या समाजाचे दर्शन घडवले. मे.पुं.रेगे, कमलेश्र्वर, असगर अली इंजिनियर, वसंत पळशीकर, ग.प्र.प्रधान, न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी, आ.ह.साळुंखे, सदानंद मोरे, पुष्पा भावे, नलिनी पंडित, य.दि. फडके, स.रा.गाडगीळ, न्या. हेमंत गोखले यासारखे विद्वान तर माधव गडकरी, कुमार केतकर, अशोक जैन, दिनकर गांगल, निळू दामले, निखिल वागळे, विनय हार्डिकर, अरविंद गोखले, मुकुंद संगोराम, परंजोय गुहा अशा ख्यातकीर्त पत्रकारांनी विचार मांडले. नंदा खरे, चिं.मो.पंडित, अच्युत गोडबोले, डॉ अनंत फडके, डॉ. अरुण गद्रे यांनी बदलत्या विश्र्वातील विज्ञान व तंत्रज्ञान उलगडून दाखवले. असंवेदनशीलतेच्या विषाणू संसर्गापासून वाचवण्यासाठी समर नखाते, अतुल पेठे, अतुल कुलकर्णी, चंद्रकांत काळे, विभावरी देशपांडे व गिरीश कुलकर्णी, माधव चव्हाण, वीणाताई गवाणकर, प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी, ज्योती सुभाष, यांनी विचार सांगितला. डॉ.हमीद दाभोलकर, विनोद शिरसाठ, अविनाश पाटील, प्रदीप लोखंडे, प्रफुल्ल कदम व जयसिंग पवार या कार्यरत तरूण पिढीने समाज बदलासाठीची कृतीशीलता सांगितली. 'आख्यान तुकोबाराय', 'आज ह्या देशामध्ये', 'अपरिचित पुल' , साहिर लुधियानवी यांच्यावरील 'मै हर एक पल का शायर हू' मोहम्मद रफी यांच्यावरील 'रफी नामा' हमीद दलवाई यांच्यावरील' हमीद- द अनसंग ह्युमनिस्ट' असे दर्जेदार दृकश्राव्य तसेच समाजसुधारक र.धो. कर्वे यांच्यावरील प्रा.अजित दळवी लिखित व अतुल पेठे दिग्दर्शित 'समाजस्वास्थ्य' नाटक आयोजित केले. २००९ साली व्याख्यानमालेचा रौप्यमहोत्सव साजरा करताना पुणे येथील 'आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या सहकार्याने' 'सवाई संगीत संमेलना'चे आयोजन करण्यात आले. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामधील विख्यात गायक श्रीमती मालिनी राजूरकर, पं.अजय पोहनकर, पं.श्रीकांत देशपांडे, श्रीनिवास जोशी, उपेंद्र भट हे गायक तसेच संतूरवादक पं.सतीश व्यास हे संगीत संमेलनात सहभागी झाले होते. लातुरात प्रथमच सादर झालेल्या 'सवाई संगीत संमेलना'चे स्वागताध्यक्ष मा. श्री. दिलीपराव देशमुख हे होते. ह्या संमेलनास तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी तीनही दिवस विशेष सवड काढून दाद दिली. तर लातूर परिसरातील अनेक रसिकांना संगीतानंद घेता आला. व्याख्यानमालेची ३६ वर्षे साजरी करताना एक विशेष कार्यक्रम सादर करताना आनंद होत आहे. सर्व राष्ट्रांना सल्ला देण्यात, त्यांच्यासाठी संशोधन करून समन्वय साधण्यात रात्रंदिवस झटत असतात. जगभरातील प्रसारमाध्यमे ज्यांच्या निवेदनाची, स्पष्टीकरणाची व सल्ल्याची वाट पाहत असतात. अशा जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मुख्य वैज्ञानिक व भारताचे भूषण डॉ. सौम्या स्वामीनाथन, ह्या अत्यंत व्यग्र दिनचर्येतून 'स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमाले ३९; च्या विनंतीस मान देऊन आपल्याशी संवाद साधण्याकरिता खास सवड काढत आहेत, ही बाब लातूरकरांसाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राकरिता अभिमानास्पद आहे. यापुढेही देशासमोरील महत्त्वाच्या विषयावरील तज्ज्ञ, शास्त्रज्ञ व विद्वानांचे विचार पोहोचविण्याच्या दृष्टीने व्याख्यानमाला प्रयत्नशील आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:46 PM Page 1

जिल्ह्यातील गावठाण जमिनीचा ड्रोन सर्व्हे करताना सार्वजनिक मालमत्तेला बाधा येऊ नये -जमाबंदी आयुक्त

लातूर/प्रतिनिधी

लातूर व उस्मानाबाद जिल्हयात गावठाण जमाबंदी प्रकल्प (स्वामित्व योजना) ड्रोन सर्व्हे करत असताना सार्वजनिक मालमत्तेला बाधा येणार नाही याची दक्षता घेऊन सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख एस.चोकलिंगम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात आयोजित लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील गावठाण जमाबंदी प्रकल्प बाबत ड्रोन सर्व्हे कार्यपध्दती प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी जी. श्रीकांत, उस्मानाबादचे जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजयकुमार फड, उपसंचालक भूमी अभिलेख अभय जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोश जोशी, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख

सुदाम जाधव उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना जमाबंदी आयुक्त एस.चोकलिंगम म्हणाले की, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील महसूल, भूमिअभिलेख व ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात गावठाण जमाबंदी प्रकल्प अंतर्गत ड्रोन सर्व्हे काम करत असताना सार्वजनिक मालमत्तेला बाधा येऊ न देता सर्वांनी समन्वयाने काम केले पाहीजे. राज्यात शेतजमीनीचा सर्व्हे झालेला आहे. तसेच सिटी सर्वे पण झालेला आहे.शेत जमिनीला पुरावा आहे. मात्र गावठाण्यामधील नागरिकांना पुरावा मिळालेला नाही. गावठाण भूमापण योजनेबाबत एस.चोकलिंगम यांनी यावेळी संबंधितांना सकोल मार्गदर्शन देऊन या सर्व्हेमुळे गावठाण हद्दीतील प्रत्येक मिळकतीचा नकाशा तयार होईल व प्रत्येक मिळकतीच्या सिमा निश्चित होऊन क्षेत्र मार्किंग होईल. या योजनेमुळे सर्व संबंधित नागरिकांना सनद, मिळकत नकाशा व मिळकत पत्रिका मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या स्वामित्व योजना सर्व्हेसाठी सर्व नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी जी. श्रीकांत व उस्मानाबादचे जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी आपआपल्या जिल्हयात गावठाण जमाबंदी प्रकल्प सर्व्हे अचूक व निर्दोष करण्यात येणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल व उस्मानाबाद जिल्हापरिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजय कुमार फड यांची समयोचित भाषणे झाली. प्रारंभी जिल्हा अधिक्षक भूमिअभिलेख सुदाम जाधव यांनी लातूर व जिल्हा अधिक्षक भूमिअभिलेख श्रीमती स्वाती लोंढे यांनी उस्मानाबाद जिल्हयाची माहिती विशद केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, उस्मानाबद जिल्हयाचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, महसूल, भूमिअभिलेख व ग्रामविकास विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे संचलन विवेक सौताडीकर यांनी तर आभार भूमिअभिलेखच्या सिमा देशमुख यांनी मानले.

जीमची वाढती संख्या नव्या पीढीला सुदृढ बनवेल-देशमुख

लातूर/प्रतिनिधी

मराठवाड्यातील जिमची सर्वाधिक संख्या असलेला जिल्हा म्हणून लातूरची सर्वत्र ओळख होत आहे. जिमची संख्या सर्वाधिक असल्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याचे प्रमाण ही वाढले आहे यातुन सुदृढ समाज निर्माण होण्यास मदत होत असल्याचे राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य तथा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले. लातूर शहरातील बार्शीरोड वरील अनिल बेंद्रे यांच्या फिटनेस फर्स्ट जिमचे पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते उदघाटन शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी करण्यात आले. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, मनपा विरोधी पक्षनेते दीपक सूळ, नांदेड जिम असोसिएशनचे अध्यक्ष संदीप सिंह, नगरसेवक विशाल जाधव, संजय ओव्होळ, पंकज काटे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पूढे बोलताना ना. अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आरोग्याच्या दृष्टीने सर्वांसाठी शरीर तंदुरुस्त व निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने चांगला पोस्टीक आहार घेऊन जिम करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे प्रतिकारशक्ती वाढते आहे. ही प्रतिकार शक्ती कोरोना काळात महत्वाची आहे हे दिसून आले आहे. आपल्या परिसरातील लोक क्रीडा विषयाकडे गांभीर्याने पाहत नाहीत त्यामुळे ऑलंपिकमध्ये आपले खेळाडू कमी प्रमाणात खेळत असलेले आपणाला दिसून येते अशी खंतही त्यांनी योवळी व्यक्त केली. प्रारंभी ना. देशमुख यांनी जीम मधील सुविधाची पाहणी केली. जीम व्यवस्थापक अनिल बेद्रे आणी सहकाऱ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास लातूर जिम असोसिएशनचे अध्यक्ष बंटी देशमुख, भगवानदास आडे, व्यंकटेश पुरी, बालाजी मददे, गणेश मुगे, संतोष बेद्रे आदीसह बेंद्रे परीवार आणी सहकारी उपस्थित होते.

कामतघर ताडाळी रस्त्याच्या दुरुस्ती कामाला मिळाला मुहूर्त!

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी सुरू असलेल्या भुयारी गटार योजनेच्या कामांमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, कामतघर ते ताडाळी या दोन किलोमीटर लांबीच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्याने या निवासी वस्ती मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या विभागातील नागरीक त्रस्त झाले होते.या बाबत सर्वाकडून ओरड होत असताना या भागातील नगरसेवक यांनी सुध्दा महापालिका प्रशासनाकडे रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत पाठपुरावा केला नंतर नुकताच या रस्त्याच्या दुरुस्ती कामाचा शुभारंभ प्रभाग समिती क्रमांक ३ च्या सभापती नंदिनी महेंद्र गायकवाड यांच्या शुभहस्ते पार पडला.

या प्रसंगी स्थानिक नगरसेवक मनोज काटेकर, तुषार चौधरी, निलेश चौधरी, हनुमान चौधरी, अशोक भोसले, शाम अग्रवाल, अस्मिता चौधरी, योगिता महेश पाटील, दीपाली दिनेश पाटील, आरपीआय शहराध्यक्ष महेंद्र गायकवाड यासह स्थानिक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रस्त्यावरील भुयारी गटर बनविणाऱ्या ईगल कंष्ट्रक्शन कंपनीने रस्ता पूर्ववत बनवून देण्याचे नियोजन असताना त्यांच्या कडून या कामास दिरंगाई झाली असून येत्या दहा दिवसांत हा रस्ता पूर्ववत करून मिळणार असल्याने नागरीकांना दिलासा मिळेल असे वक्तव्य माजी उपमहापौर मनोज काटेकर यांनी केले. या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे स्थानिकांच्या रोषास लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला सामोरे जावे लागत असल्याने मनपा आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी निवेदन देऊन रस्ता तात्काळ बनविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली त्यानंतर सदर ठेकेदार हा रस्ता बनवीत असल्याने या रस्त्यावरील वाहनचालकांना होणार त्रास कमी होणार असून भविष्यातील काँक्रीट रस्ता बनविण्याच्या कामास ही नागरीक सहकार्य करतील असा विश्वास नगरसेवक निलेश चौधरी यांनी व्यक्त केला. दरम्यान या रस्त्याने प्रवास करणे म्हणजे दुष्टचक्रात अडकल्या सारखे होत असताना उशिरा का होईना या रस्त्याची दुरुस्ती होत असल्याने नागरीकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

फेसबुकवरील अमेरिकन मैत्रणीने संपादकालाच घातला गंडा

भिवंडी/प्रतिनिधी

एका संपादकाला फेसबुकवरील अमेरिकन तरुणीशी मैत्री चांगलीच महागात पडल्याची घटना समोर आली आहे. हि घटना भिवंडी शहरातील कामतघर चंदनबाग परिसरात राहणाऱ्या एका साप्ताहिकाच्या संपादकासोबत घडली आहे. संतोष चव्हाण (४२) असे फसवणूक झालेल्या संपादकाचे नाव आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात अमेरिकन मैत्रिणीसह तिच्या साथीदारावर ४२० चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोज अँड्रीया असे गुन्हा दाखल झालेल्या अमेरिकन मैत्रणीचे नाव आहे. या दाखल गुन्हयाच्या आधारे पोलिसांनी तपास सुरु केला आहे. भिवंडी शहरातुन प्रसिद्ध होणाऱ्या एका साप्ताहिकाचे संतोष चव्हाण हे संपादक आहेत. गेल्या चार वर्षापूर्वी अमेरिकेत राहणारी आरोपी रोज अँड्रीया हिच्या सोबत फेसबुकवरून संतोष यांची मैत्री झाली होती. विशेष म्हणजे गेल्या दोन वर्षापूर्वी संतोष यांनी काही कारणावरून अचानक तिचे फेसबुक अकाऊंट ब्लॉक केले होते. त्यामुळे दोघांच्या मैत्रीचा संपर्क तुटला होता. मात्र काही महिन्यापूर्वी आरोपी रोज अँड्रीया हिने पुन्हा संतोषशी गोड गोड बोलून फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून पुन्हा मैत्री केली. फेसबुकवरच पुन्हा दोघांमध्ये मैत्रीचा सिलसिला सुरु झाला आणि याचाच फायदा आरोपी रोज उचलत एके दिवशी संतोषला मी तुझ्यासाठी अमेरिकेतून काही वस्तू पाठवल्या आहे. असा संतोषच्या फेसबुकवर अंकाऊंटवर तिने मॅसेज पाठवला. त्यांनतर २ जुलै ते ७ जुलै २०२० या कालावधीत दोघांमध्ये फेसबुकवरच या विषयी चर्चा करून एक खूपच महागडी घडी, एक मोबाईल आणि बूट आणि इतरही वस्तू पाठवल्याचे तिने सांगत या वस्तूचे फोटो फेसबुकवर शेअर केले. त्यामुळे यासर्व वस्तू तुम्ही दिल्ली कस्टम ऑफिसमध्ये रक्कम भरून सोडवून घ्यावी असे सांगितले. मात्र हे सोडविण्यासाठी माझ्याकडे पैसे नाही असे संतोषने तिला सांगताच तिने अमेरिकन डॉलर पण पाठवल्याची संतोषला थाप मारली. यामुळे तिच्या बोलण्यावर संतोषचा विश्वास बसला आणि त्यांनी दिल्लीच्या कस्टम ऑफिसमध्ये ३७ हजार ५५० रुपये कस्टम ड्युटी भरण्याची तयार झाले. त्यांनतर आरोपी रोज ने दिलेल्या दिल्ली कस्टम ऑफिसचा मोबाईल नंबर आणि बँक अकांऊंड नंबर दिला. त्यानुसार संतोष यांनी त्या मोबाईलवर संपर्क साधून तुम्ही माझ्या नावाचे पार्सल मुंबई कस्टम ऑफिसमध्ये पाठवा. मी येथूनच सोडवून घेईल. मात्र त्या अनोखळी मोबाइलधारकाने तुम्हाला दिल्लीतीलच बँक अकांऊंड नंबरवर रक्कम वर्ग करावी लागले, असे सांगितले. त्यांनतर भिवंडीतील त्यांच्या बँक खात्यातून त्यांनी ३७ हजार ५५० रुपये तिने दिलेल्या बँक अकांऊंड नंबरवर वळते केले. अमेरिकन मैत्रिणीने दिलेल्या बँक अकांऊंड नंबरवर रक्कम जमा झाल्याचे फेसबुक वरून संतोष यांनी तिला मॅसेज दिला असता तिने मात्र रिपलाय दिला. त्यामुळे संतोष यांनी तिला फेसबुकवर वारंवार संपर्क साधत असतानाच संतोष यांच्या फेसबुक अकाऊंडला तिने ब्लॉक केले. त्यांनतर कस्टम ड्युटी भरूनही चार महिने उलटून गेले तरीही रोजने आपल्याला पाठवलेल्या वस्तू मिळत नसल्याचे पाहून आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी ठकसेन अमेरिकन मैत्रीण रोज व तिच्या एका अनोखळ्या साथीदारावर गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कारवार करीत आहेत.

कोव्हिडवर मात करुन प्रशासनाचे पाऊल पुढे

कोरोना महासंकटाच्या काळात मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी राज्याची धुरा साभाळण्यास सुरुवात केली जेमतेम शासनास चार महिने होत नाहीत तोपर्यत या महामारीने रुद्र रुप दाखवण्यास सुरवात केली होती. जनतेचे प्राण वाचवणे हे शासनाचे प्रथम लक्ष होते. या साठी शासनाने आपली तिजोरी खाली केली निधीमधील मोठा हिस्सा कोरोना आटोक्यात आणण्यास दिला मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांच्या प्रचंद इच्छा शक्ती मुळे तसेच अविरत कामामुळे जिल्ह्यातील कोरोना रुग्णाचे प्रमाण कमी झाले तसेच मृत्यूदर फार मोठ्या फरकाने खाली घरसला हे सर्व करत असताना जिल्ह्यातील विकास कामे करण्यावर भर दिला गेला.

जिल्ह्यात कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या वैद्यकिय आपत्कालिन परिस्थितीवर जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभागांच्या समन्वयाने नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सामुहिक प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील रूग्ण बरे होण्याचे प्रमाण सरासरी ९० टक्के एवढे झाले आहे. रूग्णांपर्यत पोहोचण्यासाठी जिल्हा मुख्यालय आणि तालुका स्तरावर वॉर रूम कार्यान्वित आहेत. त्याद्वारे रूग्णांच्या सहवासितांचा शोध घेऊन संनियंत्रण करण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे.

जिल्ह्यात वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात एकुण ५ तर पालघर ग्रामीण भागात २२ कोविड केअर सेंटर (CCC) असुन वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात ४ हजार तर पालघर ग्रामीण भागात जवळपास ३२४६ बेड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात ३ तर पालघर ग्रामीण भागात ५ डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) आहेत. तसेच वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात ४ तर पालघर ग्रामीण भागात देखिल डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल (DCH) आहेत. या ठिकाणी रूग्णांना विविध आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यासाठी डॉक्टर्स आणि स्टाफनर्स व पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून गरजे नुसार रिक्तपदांवर भरती सुरू आहे. संशयित रुग्णांची RTPCR आणि रॅपिड न्टीजन तपासणीद्वारे चाचणी केली जाते. डहाणू येथील MRHRU (मॉडर्न रूरल हेल्थ रिसर्च युनिट).

या लॅबमध्ये दररोज चाचण्या करण्यात येत आहेत. तेथे अत्याधुनिक RTPCR मशिन बसवण्यात आले चाचण्याची क्षमता वाढवण्यात येत आहे. तसेच ग्रामीण रूग्णालय पोशेरी येथे ट्रुनॅट मशिनद्वारा चाचण्या केल्या जातात. चाचण्यांसाठी प्रयोगशाळा, रॅपीड न्टीजन कीटस्, दुर्गम भागात मोबाईल व्हॅनद्वारे न्टीजन टेस्टींग आदींचे नियोजन करण्यात येत आहे. गरजेनुसार संस्थात्मक अलगीकरण करण्यात येत असून विलगीकरण सुविधा क्षमता वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. या करीता राज्य शासनाकडून आपत्ती व्यवस्थापन निधी मधून गरजेनुसार निधी राज्य शासन उपलब्ध करून देत आहे.

कोव्हिड-१९ वर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध नाविन्य पूर्ण कृतिशील उपक्रमही राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात १८००१२१५५३२ या टोल फ्री क्रमांकासह प्रत्येक गावात व नगरपालिकेच्या प्रभागामध्ये कोरोना प्रतिबंधक समिती कार्यान्वित करण्यात आली आहे. जोखमीच्या व्यक्तींचे नियमित सर्वेक्षण करण्यासाठी प्रत्येक आशा स्वयंसेविकांना पल्सऑक्सीमीटर तसेच थर्मल स्कॅनर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या शिवाय कोव्हिड-१९ साठी प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी, रूग्णाची काळजी घेणाऱ्या व्यक्तींसाठी सूचना आदींबाबत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या बरोबरीने महसुल विभाग, पोलिस दल, जिल्हा परिषद, नगरपरिषद या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत:ला कोव्हिड-१९ च्या काळात झोकून देऊन काम करीत आहेत. आपले कर्तव्य बजावत असताना पोलीस, डॉक्टर, अंगणवाडी सेविका, व अन्य विभागातील कर्मचारी कोरोनाने शहिद झाले आहेत.

लॉकडाऊनमध्ये पालघर जिल्ह्यात अडकलेल्या परराज्यातील ७५,७७१ मजूरांना पालघर जिल्ह्यातून उत्तरप्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, ओडीशा व पश्चिम बंगाल राज्यात जाण्याकरिता ४५ विशेष श्रमिक ट्रेन सोडण्यात आल्या. सदर विशेष श्रमिक रेल्वे प्रवास भाड्याची रक्कम रुपये ४,३१,४२,५८५/- (अक्षरी सुमारे चार कोटी एकतीस लक्ष बेचाळीस हजार पाचशे पंच्याऐंशी रुपये मात्र) मा.मुख्यमंत्री सहायता निधीमधून अदा करण्यात आलेली आहे. या विशेष श्रमिक ट्रेन सोडण्यासाठी जिल्हा प्रशासन व स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचा येथे विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांनी श्रमिकांची नोंदणी करून सर्व नियमांचे पालन करुन श्रमिकांना त्यांच्या घरी सुखरुप पोचवण्यास मदत केली. तसेच गुजरात येथील पोरबंदर व वेरावळ या बंदरामध्ये अडकलेल्या जिल्ह्यातील २० हजारहून अधिक मच्छिमार बंधुना लॉकडाऊनच्या काळात डहाणू बंदरात उतरवून त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मुंबई व परिसरातून त्यांच्या मुख्य गावी पायी निघालेल्या मजुरांसाठी लेबर कॅम्प उघडून त्यामध्ये मजुरांची सोय करण्यात आली.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजने अंतर्गत माहे एप्रिल ते जूलै २०२० या कलावधीत पात्र लाभार्थ्यांना २ लाख ९५ हजार ६९८ क्विंटल तांदूळ व २१ हजार ९३६ क्विंटल गहू मोफत वितरीत करण्यात आला आहे. माहे मे व जून २०२० या काळामध्ये आत्मनिर्भर भारत आर्थिक पॅकेज योजनेअंतर्गत विनाशिधापत्रिकाधारक व विस्थापित मजूर यांना १३ हजार ५०० क्विंटल तांदुळ, व ६१५क्विंटल अख्खास चणा मोफत वितरीत करण्यात अला आहे. लॉकडाऊनच्या काळात शासनातर्फे १३ कम्युनिटी किचन द्वारे ३७ लाख २४ हजार २२३ व छ्रज्ञ १० लाख ७२ हजार ४०८ असे एकुण ४७ लाख ९६ हजार ६३१ असे फुड पॅकेट वितरीत करण्यात आले. राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करून देण्याकरिता पालघर जिल्ह्यात २६ जानेवारी २०२० पासून शिवभोजन केंद्र सुरू करण्यात आले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी सन्मान योजना २०१९

महाराष्ट्र शासनाचे महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी सन्मान योजना २०१९ जाहिर केली. सदर योजनेनुसार ज्या शेतकऱ्यांना दुष्काळ, अतिवृष्टी, नापिकीमुळे त्यांचे पिककर्ज मुदतीत परतफेड करता आले नाही. त्यामुळे त्यांना नवीन पिक कर्ज मिळत नव्हते अशा शेतकऱ्यांना त्यांचे कर्जा पासुन मुक्ती देण्यात आली. पालघर जिल्ह्यात सदर योजनेनुसार आतापर्यत ११ हजार २०० शेतकऱ्यांना रु. ६२.०० कोटींचा लाभ देण्यात आला. तसेच या शेतकऱ्यांपैकी आतापर्यत ५,५०० शेतकऱ्यांना नव्याने पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले असुन उर्वरीत शेतकऱ्यांना चालु हंगामात पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जिल्ह्याचे खरीप हंगामातील सरासरी क्षेत्र १ लाख ०३ हजार २२५ हेक्टर असून आतापर्यत ८८,०३० हेक्टर वर (८५%) पेरणी झाली आहे. उर्वरीत पेरणी अंतिम टप्प्यात आहे. यात प्रामुख्याने भात ६८,२७० हेक्टर, नागली ७४७४ हेक्टर चा समावेश आहे.

खरीप हंगामात कृषी विभागाने ६७ हजार आदिवासी शेतकऱ्यांसाठी प्रती शेतकरी २५० ग्राम तुरीचे बियाणे मोफत वाटप करून त्याची पेरणी भाताच्या शेताच्या बांधावर करून घेतली आहे. यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना येणाऱ्या कालावधीत चांगल्या प्रतीची तूर उपलब्ध होईल. यामुळे त्यांच्या आहारात प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होऊन कुपोषण कमी होण्यास मदत होणार आहे.

भाताच्या एक पद्धतीमध्ये जोखिम असल्याने फळबाग आधारित शेती पद्धतीस चालना देण्यासाठी जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून आतापर्यत २५७२ हेक्टर वर फळबाग लागवड करण्यात आली आहे. प्रामुख्याने जव्हार, मोखाडा व विक्रमगड तालुक्यात जवळपास १ लाख ७५ हजार काजू कलमे लावण्यात आली आहेत. ही कलमे रत्नागिरी जिल्ह्यातून उडठ अंतर्गत डढ व गडथ यांच्या सहयोगाने वाहतूक करून शेतकऱ्यांना मोफत देण्यात आली. जिल्ह्यात एक वर्षापूर्वी अतितीव्र कुपाषित बालकांची २७३ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या २४८० इतकी होती. जिल्ह्यातील कुपोषण व बाल मृत्यु कमी करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष टास्क फोर्सच्या माध्यमातून केलेल्या कामामुळे आज अनुक्रमे २३४ व २२२५ इतकी कमी करण्यात यश आले आहे. शासनाने नुकतीच आदिवासी बहुल भागातील नागरिकांसाठी लॉकडाऊनच्या परिस्थितीत विशेष मदत मिळण्यासाठी खावटी योजना मंजुर केली असून त्याचा जिल्ह्यामधील नागरिकांना फायदा होईल.

पालघर जिल्ह्याचे सुसज्ज व आदर्श असे प्रशासकीय मुख्यालय नजीकच्या काळात जिल्हावासियांना लाभणार आहे. सिडकोकडून सदर प्रकल्पाचे काम सुरू असून इमारतीचे स्थापत्य बांधकाम पूर्ण होत आहे. विद्युतीकरण, फर्निचर व रंगरंगोटीचे काम सुरू आहे. सदर काम पूर्ण होऊन लवकरच जिल्हा प्रशासनाचे काम नवीन इमारतीतून सुरू होईल. आज पालघर जिल्ह्यात जी विकासकामे सुरू आहेत, ती पाहता लवकरच आपला जिल्हा राज्यात प्रगतीशील जिल्हा म्हणून ओळख निर्माण करेल यात शंका नाही. शासन आणि जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न तसेच जनसहभाग यामुळेच हे साध्य होत आहे. कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे उद्भलेल्या आपतकालीन परिस्थितीत सर्व नागरिकांनी आता पर्यत विशेष सहकार्य केले आहे.

विशेषत: शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकत म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे व गृह भेटीद्वारे शिक्षण देण्याचे काम सुरू आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी' या अभियानाच्या माध्यमातुन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात शासनाला यश मिळाले आहे. या अभियाना अंतर्गत या नागरिकांनी स्वयंशिस्त पाळून मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर राखणे व वारंवार हात धुणे या बाबींचा अंगीकार करून त्याचे पालन केल्याचे जानवत आहे. या अभियानामुळे जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या नियत्रणात ठेवण्यात प्रशासनास यश मिळाले आहे. कोरोना गेला नाही नागरिकांनी काळजी घेऊन आपले दैनंदिनी व्यवहार करावे असे अवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी जनतेला वेळोवेळी केले आहे. जनतेने सुध्दा या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन जिल्हा प्रशासनाच्या हातात हात घालून या युध्दात अटीतटीचा संघर्ष केल्याचे निदर्शनास आले आहे.

- राहूल भालेराव
जिल्हा माहिती अधिकारी, पालघर

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 6 (CRIME SANDHYA) new:Layout 1 28/11/2020 8:47 PM Page 1

पान १ वरून....

संकट काळातही महाविकास आघाडीच्या ...

मंदिरे उघडण्यासाठी आंदोलने करीत होते. लोकांनी एकत्र जमू नये, सोशल डिस्टेन्स पाळावा असे केवळ सरकारच नव्हे, तर डॉक्टर सांगत होते. तरीही भाजपवाले आंदोलने करीत होते. मंदिरे उघडण्यासाठी रस्त्यावर गर्दी जमवून सोशल डिस्टेन्सच्या नियमाची वाट लावत होते. आता मंदिरे उघडली गेलीत, पण कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून मंदिर व्यवस्थापनानेच काही मंदिरे बंद ठेवलीत, तर काही मंदिरात सर्व नियम पाळून मोजक्याच लोकांना प्रवेश दिला जात आहे. मग जे मंदिरांच्या व्यवस्थापकांना कळतंय ते मंदिरे खुली करण्यासाठी बोम्बाबोम करणाऱ्या भाजपवाल्यांना का कळले नाही. महाराष्ट्रावर आज ५ लाख कोटींचे कर्ज आहे. लॉकडाऊनच्या काळात उद्योग धंदे बंद असल्यामुळे सरकारचा महसूल बुडाला, आता कुठे अनलॉक प्रक्रियेंतर्गत उद्योग धंदे सुरु झालेत. पण राज्याची विस्कटलेली आर्थिक घडी बसायला आणखी काही काळ लागेल. त्यासाठी केंद्राची आर्थिक मदत हवीय. महाराष्ट्राचे केंद्राकडे जीएसटीच्या परताव्याचे ३८ हजार कोटी आहेत. इथल्या भाजपवाल्यांनी त्याच्यासाठी आंदोलन करावे, मंदिरे उघडण्यासाठी कसली आंदोलने करता. महाराष्ट्रातील जनतेच्या केंद्राकडे असलेल्या हक्काच्या पैशासाठी आंदोलन करा! कारण आज संकटाच्या काळात हा पैसा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कोरोना बाधितांच्या उपयोगी पडू शकतो. पण त्याच्यासाठी भाजपने काही केलेलं नाही.

या उलट महाविकास आघाडीतील शिवसेना-राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या सरकारांनी कोरोनाच्या संकट काळात ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांपासून शहरी भागातल्या कामगारपर्यंत सर्वांना मदत केली. महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत ३०.७७ टक्के खातेदारांना १९.६४३ कोटींचा लाभ मिळवून दिला. विक्रमी कापूस खरेदी केली. अतिवृष्टी मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १० हजार कोटींची मदत दिली. रब्बी हंगामात प्रथमच भरड धान्य खरेदी केले. शिभोजन थाळी ५ रुपयांना दिली. त्यामुळे २.५० कोटी गरिबांच्या मुखी अन्नाचा घास मिळाला. कोरोनावर मात करण्यासाठी सरकार मधील मंत्र्यांनी जीवाचे रान केले. अनेक कोविंद सेंटर उघडली. जास्तीत जास्त कोरोना टेस्ट व्हाव्यात म्हणून कोरोना चाचण्यांचा दर कमी केला. माझे कुटुंब माझी जबाबदारी या योजनेअंतर्गत घरोघरी जाऊन कोरोना टेस्ट केल्या. सरकार मधील मंत्री कोरोनाच्या संकट काळात लोकांमध्ये जाऊन मिसळत होते, म्हणून काही मंत्र्यांना कोरोनाची लागण झाली, तर सत्ताधारी पक्षाच्या दोन आमदारांचा बळीही गेला. हे सर्व पाहता महाविकास आघाडी सरकारचे वर्षभरातील काम निश्चितच चांगले आहे. त्यामुळे विरोधी पक्षाचे लोक किती जरी बोंबलले तरी त्याचा काहीच परिणाम होणार नाही.

ड्रायव्हरच्या हत्येचा प्लान केला ...

देखभाल करण्याचे काम करत होते. परंतु १७ जुलै रोजी ते घोडबंदर भागातील नागलाबंदर परिसरातून अचानक बेपत्ता झाले. भाऊ अनिल जावीर यांच्या तक्रारीनंतर कासारवडवली पोलिसांनी तानाजी यांचा शोध घेण्यासाठी तीन पथके तयार केली. चौकशीमध्ये तानाजी यांची हत्या झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींची धरपकड सुरू केली. सुरुवातीला कल्याणमधून संतोष घुगरे याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीमध्ये मंगेश मुरुडकर याच्या मदतीने तानाजीची १७ जुलै रोजी हत्या केल्याची बाब समोर आली. मंगळवारी कासारवडवली पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपींची धरपकड सुरू केली होती. घुगरे, मुरुडकर यांच्यासह गीता आरोळकर आणि कल्पना नागलकर या दोन महिलांनाही अटक केली. चौघांनाही न्यायालयाने शनिवारपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. या चौकशीमध्ये आणखी धक्कादायक बाबींचा उलगडा झाला आहे. तानाजी कल्पनाच्या मालमत्तेचे काम पाहत होता. परंतु मालमत्तेच्या वादातून त्यांच्यात सतत भांडणे होत असत. त्यामुळे तानाजीचा काटा काढण्यासाठी कल्पनाने गीताला एक लाख ४० हजारांची सुपारी दिली. त्यानंतर संतोष आणि मंगेश या दोघांनी तानाजीला दारू पिण्याच्या बहाण्याने गायमुख खाडी येथे बोलवले आणि दारूमध्ये विषारी औषध मिसळून तानाजीची हत्या केली. नंतर मृतदेह गायमुख खाडीकिनारी निर्जन स्थळी फेकून केला. मृतदेहाचे अवशेष आणि कपडे जप्त करण्यात आले आहेत. संतोषला या कामाचे काही पैसे मिळाले असल्याची बाब चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. कासारवडवली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक किशोर खैरनार यांच्या नेतृत्वाखाली पोलिस निरीक्षक अविनाश काळदाते, जयराज रणवरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक सागर जाधव, पोलिस उप निरीक्षक कुलदीप मोरे यांच्या पथकाने या गुन्ह्याची उकल केली.

विरारमध्ये सव्वा चार कोटींची ...

विरारमध्ये कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये पैसे भरण्यासाठी आलेली कॅशव्हॅन चालकानेच पळवून नेली होती. या व्हॅनमध्ये सव्वाचार कोटी रुपयांची रोकड होती. अखेर पोलिसांनी चोरट्यांना अटक केली आहे. ऐन दिवाळीत विरारमध्ये सव्वाचार कोटीची रोकड लंपास करणारे चोरटे अखेर पोलिसांच्या हाती लागले आहेत. मुख्य चोरासह चोरीच्या घटनेत मदत करणारे आणखी दोन साथीदारांनाही पोलिसांनी अटक केली आहे. त्याचबरोबर चोरीला गेलेली सव्वाचार कोटी रुपयांची रक्कमही पोलिसांनी जप्त केली आहे. विरार पश्चिमेकडील बोळींज भागात असलेल्या कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये पैसे भरण्यासाठी आलेली कॅशव्हॅनच आरोपी चालकाने १२ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडे पाचच्या सुमारास पळवून नेली होती. रायटर बिझनेस कंपनीचे कंत्राट असलेली कॅशव्हॅन ठाण्याच्या कापुरबावडी इथून ४ कोटी ५३ लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन निघाली होती. त्यातील आजूबाजूच्या तीन एटीएममध्ये २८ लाख रुपये भरण्यात आले. त्यानंतर विरारच्या बोळींज येथील कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये पैसे भरण्यासाठी कॅशव्हॅन आली. गाडीतील लोडर आणि बॉडीगार्ड उतरल्यावर चालक रोहित बबन आरु हा कॅशव्हॅनसह पळून गेला होता. वेळ काढण्यासाठी बाथरुमला असल्याचं चालक सांगितलं. मात्र २० ते २५ मिनिटांनी मोबाईल बंद झाल्याने लोडरने पोलिसांना फोन करुन माहिती कळवली. मात्र तोपर्यंत व्हॅन हायवेपर्यंत पोहोचली होती. १३ नोव्हेंबरला सकाळी एम एच ४३ बीपी ४९७६ या नंबरची कॅशव्हॅन भिवंडी कल्याण बायपास रोडच्या बाजूला सापडली. कॅशव्हॅन मिळाली त्यात चोरी झालेल्या ४ कोटी २५ लाखांपैकी २ कोटी ३३ लाख ६० हजार रुपयांच्या पाचशे, दोनशे आणि शंभरच्या नोटांची रक्कम मिळून आली. तर चोरटा १ कोटी ९१ लाख ४० हजार रुपयांच्या दोन हजार आणि पाचशेच्या नोटांचे बंडल घेऊन पळाला होता. २ कोटी ३३ लाख ६० हजार रुपयांच्या पाचशे, दोनशे आणि शंभरच्या नोटा असल्याने चोरटा वजन उचलू शकला नाही, त्यामुळे त्याने उर्वरित रक्कम तेथेच ठेवली. त्यानंतर चालत जात शहरात पोहोचला. दुसऱ्या दिवशी त्याने खाजगी टॅक्सी करुन, प्रवास केला. त्या टॅक्सीचालकाला त्याने तब्बल पन्नास हजार टॅक्सीचं भाडं दिलं. पोलिसांनी या प्रकरणात तिघांना ताब्यात घेतलं आहे. मुख्य आरोपी रोहित आरु हा आहे. तर रोहितचा मित्र अक्षय मोहिते तसेच त्याचा गावचा मित्र चंद्रकात उर्फ बाबुशा गायकवाड यालाही अटक करण्यात आली आहे. रोहित आणि अक्षयने चार दिवसांपासून चोरीच्या घटनेचं नियोजन आखलं होतं. कॅशव्हॅन पळवल्यानंतर अक्षय इको गाडी घेऊन मागून येणार होता. मात्र चोरीनंतर अक्षय आणि रोहितचा संपर्क होऊ शकला नाही. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे तपासणी केल्यानंतर रोहितच्या व्हॅनच्या मागून अक्षयची गाडी दिसत होती. त्यानुसार पोलिसांनी छडा लावला. या चोरीची उकल करण्यासाठी पोलिसांनी पाच पथक नेमली होती. एक पथक त्याच्या गावीही गेलं होतं. आणि त्याच पथकाला गावाहून रोहित आणि त्याला मदत करणारा चंद्रकांत गायकवाड मिळाला. त्यांच्याकडून १ कोटी ८८ लाख १९ हजार १०० रुपये रोख रक्कम मिळाली. तिघेही आरोपी मित्र असून चालक आहेत. त्यातील अक्षयवर यापूर्वी चोरीचा गुन्हाही दाखल आहे. आरोपी रोहितने चोरीच्या पैशातून दीड लाखाची बुलेटही घेतली होती. ती ही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. रोहितने या पाच दिवसात १ लाख ७० हजार खर्च ही करुन टाकले होते. या चोरट्यांना आपणं पकडलं जाणारं हे माहित होतं. मात्र पकडल्यावर एकही पैसा पोलिसांना कुठे आहे हे सांगायचं नाही. चोरीची शिक्षा भोगून आल्यावर त्या पैशाने मौज मज्जा करण्याचा त्यांचा इरादा होता मात्र तो इरादा पोलिसांनी हाणून पाडला. काही दिवासापूर्वी एक कॅमेरा शहरासाठी ही संकल्पना मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तलयामार्फ चालू करण्यात आली होती. त्या संकल्पनेचा फायदाही पोलिसांना या चोरीची उकल करताना झाला. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली असून, आता पुढील तपास करत आहेत.

धान्याच्या धंद्यात त्याचे मोठे दिवाळे...

लातूर जिल्ह्यातील रेणपूर पोलिस ठाणे हाद्दीत घडली आहे. आजी-आजोसोबत गावाकडे आलेल्या रियांश सावंत नामक पाच वर्षीय चिमुकल्याला सायंकाळी सव्वापाच वाजण्याच्या सुमारास आकाशी रंगाच्या एका सॅन्ट्रो कारमधून पळवून नेण्यात आले होते. पोलिसांच्या सर्तकतेमुळे दुसऱ्या दिवशी हा अपहृत मुलगा पोलिसांना मिळून आला; पण अपहरणकर्ते फरार होते. या प्रकरणाच्या तपासात लातूरच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने सातत्य ठेवून अखेर अपहरण कर्त्यांचा माग काढत खंडणीखोरांच्या मुस्क्या आवळल्या व एका गुढ गुन्ह्याला वाचा फोडली. याबात पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, मुळचे सांगवी, ता. रेणापूर येथील निळकंठ देवीदास सावंत हे गेली ४० वर्षांपासून लुईसवाडी, ठाणे येथे व्यापारानिमित्त स्थायीक आहेत. तिथे त्यांचा किराणा मालाचा होलसेल व्यापार आहे. गावाकडे त्यांना जमीनही आहे. त्यांचे वडील देवीदास सावंत, आई, ते स्वतः अधुन-मधून गावाकडे येतात. नोकराकरवी शेती करतात. सप्टेंबर महिन्याच्या सुस्वातीच्या आठवड्यात देवीदास सावंत, त्यांच्या पत्नी व देवेश (वय ७ वर्ष), रियांश (वय ५ वर्ष) हे दोन नातू सांगवी या गावी आले होते. ११ सप्टेबर २०२० रोजी नेहमीप्रमाणे हे दोन्ही मुले दुपारी ३ ते ३:३० वाजण्याच्या सुमारास घरासमोर इतर मुलांसोबत खेळत होते. या पैकी मोठा मुलगा देवेश हा ५ वाजण्याच्या सुमारास घरात आला. मात्र रियांश आलाच नव्हता, इतर मुलांसोबत तो खेळत असावा म्हणून त्याच्याकडे आजी-आजोबांनी विशेष लक्ष दिले नाही. सांयकांळ होऊनही लहानगा रियांश घरी आला नसल्याने सगळे चिंतेत पडले. देवीदास सावंत व त्यांच्या पत्नीने नातवाला शोधण्याच प्रयत्न केला मात्र गावात त्याचा कुठेही पत्ता लागला नाही. दरम्यान सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास आकाशी रंगाची एक सॅन्ट्रो कार घरासमोरून भरधावपणे सिंधगावच्या दिशेने निघून गेल्याची माहिती गावातील काही व्यक्तींनी देविदास सावंत यांना दिली. रियांशचे अपहरण झाले असावे, अशी भिती त्याचे आजोबा देवीदास विठ्ठलराव सावंत यांनी व्यक्त केली. देवीदास विठ्ठलराव सावंत याच्या फिर्यादीवरून रेणापूर पोलीस ठाण्यात रियांश सावंत याला अज्ञात आरोपीने वाईट उद्देशाने पळवून नेल्याची तक्रार दाखल केली. त्यांच्या या तक्रारीवरून रेणापूर पोलिस ठाण्यात गुरनं ५७९/२०२० कलम ३६३ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. रेणापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गोरख दिवे यांनी तपासाचे चक्र गतिमान करून तपासाला सुरूवात केली. दरम्यान घटनेचे गांर्भिय ओळखून जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांनी घटनेचा आढवा घेवून सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना समांतर तपासाचे अदेश दिले. दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देवून घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली. मुलाचे पैशासाठी अपहरण झाले असावे असा प्राथमिक अंदाज पोलिसाकडून वर्तविण्यात आला. संपुर्ण जिल्हाभर नाकाबंदी करण्यात आली. मात्र पोलिसांना कुठलाच धागा हाती लागला नाही. पोलिस तपास जारी आसताना १२ सप्टेंबर रोजी अपहरण करण्यात आलेला रियांश सावंत हा लातूर तालुक्यातील चाटा-भोयरा रस्त्यावर आढळून आला. काही शेतकऱ्यांच्या मदतीने त्याला पोलिसांच्या हावाली केले. पोलिसांनी रियांश याला बोलते करून जमेल तेवढी माहीती हास्तगत केली. चिमुकल्या रियांशने पोलिसांनी त्याल कोणीतरी काकानी कारमध्ये घेवून गेले होते एवढीच माहीती दिली. पोलिसांनी सगळी माहीती घेवून रियाश सावंत याला त्याच्या आजी-आजेबाकडे सुर्पूद केले. रेणापूर तालुक्यातील सांगवी यासारख्या खेडे गावातून एका लहान मुलाच्या अपहरण झाले होते का? का त्याला कोणी सहज घेवून गेले होत ? याचे पोलिसांच्या भोवती एक गुढतेचे वलय निर्माण झाले होते. या अपहरणामागे खंडणीचा उद्देश हाते की याचा नेमका उलगडा होणे गरजेचे होते. या घटनेने जिल्हाभरात उलट-सुलट चर्चेला ऊत आला होता. रियांश मिळून आला आसलातरी लातूरच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू ठेवला होता. गोपिनी माहीती आधारे व एका गुप्त खबऱ्याकडून याप्रकरणातील काही महत्वाची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे, सपोनि रेजीतवाड, पीएसआय लक्ष्मण कोमवाड, पोलीस कर्मचारी सिद्धेश्वर जाधव, सुधीर कोळसुरे यांनी संशयीत आरोपीवर बारीक लक्ष ठेऊन त्यांच्या हालचाली टिपत होते. सावज टप्यात आल्याबरोबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी लातूर शहरातील माताजी नगर भागातून केरबा उर्फ किरण लक्ष्मण मुदाळे (रा. काळमाथा ता. औसा जि. लातूर हाल्ली मुक्काम मातापी नगर लातूर) या संशयीत आरोपीला ताब्यात घेवून विचापुस केली असता त्यांने पालिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्याला पोलिसी खाक्या दाखवताच तयांने आपलया सेबत आसलेल्या अनय तीन जणांच्या मदतीने रियांशचे अपहरण करून खंडणी मागणार होतो असे पोलिसांना कबूल केले.व सांगण्यास सुरूवात केली. मुळचे रेणापूर तालुक्यातील निळकंठ देवीदास सावंत यांच्या लुईसवाडी, ठाणे येथील किराणा दुकनात केरबा उर्फ किरण लक्ष्मण मुदाळे (रा. काळमाथा, ता. औसा)हा काही वर्षे नोकर होता. काही महिन्यांपुर्वीच त्याने या दुकानातील नोकरी सोडून त्याच परिसरात स्वतःचे किराणा दुकान टाकले. केरबा मुदाळे हा निळकंठ सावंत यांच्या होलसेल दुकानातूनच माल खरेदी करायचा. दरम्यान, केरबा मुदाळे याचे दिवाळे निघाले. त्याची आर्थिक परिस्थिती बिकट बनली. तेंव्हा त्याने आपले जुने मालक निळकंठ सावंत यांच्या मुलाचे अपहरण करावे व मोठ्या रकमेची मागणी करावी, असा कट रचला केरबा मुदाळे याने या कामासाठी भाऊ मारोती लक्ष्मण मुदाळे, चुलत पुतण्या दीपक राम मुदाळे याला सोबत घेतले. केरबा मुदाळे याने सांगवी, ता. रेणापूर येथील गजानन उर्फ गज्जू लक्ष्मण सावत याच्याशी सतत संपर्क ठेवला. गजानन सावंत हा निळकंठ सावंत यांचे दोन्ही मुले कोठे आहेत, काय करीत आहेत. घरासमोर किती गर्दी आहे. अपहण कसे करता येईल याविषयी सतत संपर्कात असायचा. ११ सप्टेंबर २०२० रोजी दुपारी ३.३० पासूनच आकाशी कलरची एक सॅन्ट्रो कार गावातील चौकात उभी होती. त्या कारच्या काचेला डार्क फिल्म बसविण्यात आली होती. आत नेमके कोण आहे, कितीजण आहेत हे बाहेरून दिसत नव्हते. या कारमधील व्यक्तींनीच विशेष करून केरबा मुदाळे या मुख्य सूत्रधाराने रियांशचे या गाडीतून अपहरण केले. यावेळी मारोती मुदाळे हा गाडी चालवीत होता. या मुलाचे अपहरण करून मुदाळे याने रियांशला त्याच्या वडजी येथील मामाच्या घरी नेऊन ठेवले. त्याला तिथे खाऊ-पिऊ घालण्यात येत होते. मात्र, अपहरण झाल्याची तक्रार पोलिसांत येताच सबंध पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. वातावरण टाईट आहे, अशी माहिती गजानन उर्फ गज्जू सावंत याने सांगवी गावातून केरबा मुदाळे यास दिली. तेंव्हा घाबरलेल्या अपहरणकर्त्यांनी रियांशला औसा तालुक्यातील मौजे वडजी गावातून हिरो आयस्मार्ट एम.एच २४ एएम ४९७० या सिल्व्हर कलरच्या मोटार सायकलीवरून चाट भोयरा रस्त्यावर सोडून पलयान केले. पोलसांनी तपासाचे चक्र गतिमान करून या प्रकरणातील अन्य आरोपी मारोती लक्ष्मण मुदाळे, दीपक राम मुदाळे हा. मु. मोतीनगर लातूर व रेणापूर तालुक्यातील सांगवी गावातून गजानन उर्फ गज्जू लक्ष्मण सावंत यास ताब्यात घेतले. रियांश सावंत याच्या बदल्यात केरबा मुदाळे यास मोठी रक्कम खंडणी म्हणून हवी होती. पण केरबा हा रियांशचे आजोबा अथवा वडील निळकंठ सावंत यांच्याशी संपर्क साधू शकला नाही किंवा त्याला संपर्क साधता आला नाही. इकडे पोलिसांनी रियांशला शोधून काढल्यापासून केरबा मुदाळे, मारोती मुदाळे, दीपक मुदाळे हे वेगवेगळ्या ठिकाणी राहत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने या अपहरण नाट्यामध्ये केरबा मुदाळे मुख्य सुत्रधार असल्याची खात्री पटताच तो व त्याच्याशी संबंधीत असलेल्या व्यक्तींवर पोलिसांनी लक्ष केंद्रीत केले व त्याच्या मुस्क्या आवळून उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्याकडून अपहरणासाठी वापरण्यात आलेली (एमएच १२ सीके १४२३)सॅन्ट्रो कार, मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, पोलीस कर्मचारी बालाजी जाधव, राम मस्के, नितीन कठारे, चालक सचिन मुंडे, सायबर सेलचे राजेश कंचे, स्वामी यांच्या पथकाने केली.

उधारीचा व्यवहार पूर्ण नाही केला...

राहणारा पारस गुप्ता असल्याचे समजले. मृताची ओळख पटताच पोलिसांनी मोठ्या कौशल्याने तांत्रिक बाबींचा आधार घेऊन तपास करून या गुन्ह्यातील आरोपी सुरेशकुमार नारायण विष्णोई (२१), सुरेशकुमार कृष्णराम विष्णोई (२१), सुरेशकुमार नारायण विष्णोई (२५), भवरलाल चेनाराम विष्णोई (३८) अशा चौघांना अटक केली. त्यानंतर त्यांची कसून चौकशी केली असता पारस गुप्ता याच्याकडे ओमप्रकाश विष्णोईचे भंगाराच्या उधारीचे पैसे होते. मात्र अनेक वेळा हे पैसे मागूनही तो देत नव्हता. त्यामुळे त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने पारसच्या मानेवर लाकडी दांड्याचे प्रहार करून त्याला ठार मारले आणि पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी बाजूलाच पडलेले केमिकल अवतीभवती टाकून याला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. तसेच पारसचा मृतदेह गोणीमध्ये भरून आपल्या इको व्हॅन मधून तो मृतदेह पश्चिम द्रुतगती मार्गावरील बाफाणे इथल्या झाडीत टाकला आणि अशा तऱ्हेने आरोपींनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. वालीव पोलिसांनी मोठ्या कौशल्याने या गुन्ह्याचा तपास करून आरोपींना गजाआड केले. सदर कारवाई पोलीस उपयुक्त संजयकुमार पाटील वसई विरार परिमंडळ, तुळींज विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे, वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास चौघुले, पो.नि.पो.नि. चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.न. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनावणे, राजेंद्र फड, पो.शी. बालाजी गैक्वाद, सचिन बलिद, गजानन गरीबे यांच्या पथकाने केली.

पान ८ वरून....

शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी तत्परतेने ...

गोविंदराव भोपणीकर यांनी देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबीनचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करावी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आधार द्यावा, ऊस लागवडीसाठी आर्थिक मदत करून उसाचा प्रश्न सोडावावा असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन भोपणीकर यांनी केले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज शिरसाठ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सरव्यवस्थापक पदी निवड झाल्याबद्दल तानाजी जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला, तसेच रसिका महाविद्यालयाच्या वतीने माधव गणेश बोंद्रे, ईश्वर फाल्गुन जाधव या दोन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल त्यांचा व पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास देवणी तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, सदस्य व प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ.प्रशांत भंडे यांनी केले. आभार अंकुश माने यांनी केले.

भिवंडीत महिला वनधिकाऱ्यांना धक्काबुक्की...

दोघांवर अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये मोठा भाऊ भाजपचा कार्यकर्ता असून खैर, चंदन सप्लाय करण्याचा व्यवसाय असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र पोलिसांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे गुन्हेगारीत वाढ होत आहे. त्यामुळे आता ठाणे पोलीस अधीक्षक यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिक करीत आहे.

पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी सदैव ...

त्यांच्या कर्तव्याचा आपण आदर केला पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'अतुल्य हिंमत' हे युक्ती आणि प्रसंगी शक्तीचा वापर करुन पोलिसांनी कोविड काळात केलेल्या कामगिरीचा सचित्र दस्तावेज आहे. हे पुस्तक अप्रतिम झाले असून मी त्याकडे मुख्यमंत्री, नागरिक आणि कलावंत अशा तिहेरी भुमिकेतून पाहत आहे. अतिशय सुबक मांडणी व सुयोग्य सादरीकरण या कॉफिटेबल बुकमध्ये आहे. अशा प्रकारच्या अप्रतिम कॉफिटेबल बुकच्या निर्मितीबद्दल मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालकांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव जगात सर्वदूर - गृहमंत्री अनिल देशमुख

या हुतात्मा दालनाचे उद्घाटन शहीद पोलीस बांधवांच्या वीर पत्नी व कुटुंबियांकडून होत आहे, ही आनंदाची बाब आहे, अशा शब्दात गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, देशाचा कणा असलेल्या मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी जो हल्ला झाला तो मोठ्या हिंमतीने आपल्या पोलीस व जवानांनी परतवून लावला. ९ अतिरेकी मारले व एका अतिरेक्याविरुद्ध न्यायालयाद्वारे लढा लढवून त्यास फासावर लटकवले. नक्कीच आपल्या पोलिसांचे यात शौर्य आहे. नक्षलवादी, अतिरेकी, गुन्हेगार, समाजकंटक अशा वेगवेगळ्या समाजविघातक शक्तींशी सामना करुन आपले पोलीस कारवाई करत असतात. तसेच विविध आपत्ती काळातही पोलीस कार्यरत असतो. सध्याच्या कोरोना काळात तर पोलीस चोवीस तास कार्यरत आहेत. कोरोना विरुद्धची लढाई अजून सुरू आहे. ही लढाई अनिश्चित काळ आहे. पण आपले पोलीस दल हिंमत हरलेले नाहीत. महाराष्ट्र पोलिसांचे नाव संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. त्यांचे कर्तव्यावरील कौशल्य, चाणक्षबुद्धी, शिस्त याचे सर्वत्र कौतुक होते. कोरोनामुळे कर्तव्यावर असताना मृत्युमुखी पडल्यास पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान आपण मंजूर केले. राज्य शासन, मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदय पोलीस विभागासाठी सदैव सकारात्मक आहेत. विभागाच्या इतर मागण्यांचाही लवकरात लवकर विचार होईल, असे गृहमंत्र्यांनी यावेळी सांगितले. कॉफिटेबल बुकमुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीचे नेमके दर्शन दस्तावेज म्हणून राहील. विविध कल्पना आणि तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करुन पोलिसांनी कोरोना काळात केलेले काम या पुस्तकरुपाने जतन केले जाईल, असेही ते म्हणाले. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला एक तप पूर्ण झाले. त्यानिमित्त राज्यात उभारण्यात आलेले हे हुतात्मा दालन सर्वसामान्य नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध असावे, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. आपल्या प्रास्ताविकातून पोलीस महासंचालक सुबोध जायसवाल यांनी हुतात्मा दालन व अतुल्य हिंमत या कॉफीटेबल बुक संदर्भात माहिती दिली. १९६४ ते २०१९ या कालावधीत विविध घटनांमध्ये शहीद झालेल्या ७९७ हुतात्म्यांची एकत्रित माहिती या दालनात उपलब्ध आहे. तसेच विविध फिल्म्सद्वारेही पोलिसांच्या शौर्याची माहिती दालनातून दिली जाते. माजी पोलीस महासंचालक दत्ता पडसलगीकर यांनी सुरू केलेल्या हुतात्मा दालन निर्मितीची परिपूर्ती आज झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सध्या हे दालन रविवारी शालेय विद्यार्थ्यांसाठी खुले करण्याचे नियोजन असून भविष्यात ते सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या सुरुवातील शहीदांचे कुटुंबिय श्रीमती विनीता अशोक कामटे, श्रीमती स्मिता विजय साळसकर, श्रीमती तारा ओंबळे, श्रीमती मानसी शिंदे तसेच श्रीमती जिजाबाई आलम यांच्या हस्ते हुतात्मा दालनाचे औपचारीक उद्घाटन करण्यात आले. तद्नंतर सामाजिक अंतर राखून आयोजित केलेल्या हॉलमधील या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या संदर्भातील एक लघुपट दाखविण्यात आला. यात हुतात्म्यांचे नातेवाईक, तपास अधिकारी यांच्या मुलाखती आहेत. पोलिसांनी दाखविलेले धैर्य व धाडस सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणारा हा लघुपट आहे.

यावेळी आमदार भाई जगताप, मुख्य सचिव संजय कुमार, अपर मुख्य सचिव (गृह) सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, पोलीस आयुक्त परमवीर सिंग तसेच सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) डॉ. सुहास वारके यांनी केले तर आभार प्रदर्शन अपर पोलीस महासंचालक सिंघल यांनी केले.

वीजवितरणच्या कार्यालयासमोर वाढीव...

यांच्यासह प्रदेध आघाडीचे राजू दळवी, जिल्हा युवा मोर्चावर कुणाल साळवी, नगरसेवक मनीष देहेरकर, राम भोईर, महिला तालुका अध्यक्ष अंकिता दुबेले, मोहनिष पाटील, पंकज पिंगळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

लातूर शहरातील ओल्या कचऱ्यापासून...

आहे. परिणामी डेपोवर जाणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात घट झाली आहे. लातूर शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची दररोज स्वच्छता केली जात आहे. घरोघर जाऊन नागरिकांकडून ओला व सुका कचरा विलगीकरण करून स्वीकारला जात आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे. महापालिकेच्यावतीने शहरात वेगवेगळ्या चार ठिकाणी विकेंद्रित पद्धतीने ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. त्यापैकी प्रभाग क्रमांक ५ मधील महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या पुढाकारातून उभारलेल्या खत निर्मिती प्रकल्प मागील ३४ महिन्यांपासून अविरतपणे कार्यरत आहे. शासकीय कॉलनी व फ्रुट

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:48 PM Page 1

वर्षपूर्ती शासनाची गतीमान वाटचाल कोकणाची!

कोकण महसूल विभागात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश आहे. प्रत्येक जिल्ह्याचे स्वतंत्र असे वैशिष्ट्य आहे. सागरी, डोंगरी, शहरी आणि औद्योगिकरणात विभाग पुढे आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सरकारने वर्षभरात कोकण विभागात अनेक महत्वाचे निर्णय घेतले. गणपतीपुळे विकास कार्यक्रमाअंतर्गत भरीव निधी देण्यात येवून पर्यटनाच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना देण्यात आली. कोरोना सारख्या महाभयंकर आपत्तीला महाराष्ट्राने समर्थपणे तोंड दिले. कठीण काळ होता. तरीही विकासाचा वेग आणि सर्वसामान्य माणासाच्या हिताचा निर्णय घेण्यास शासन कमी पडले नाही. महाराष्ट्र थांबणार नाही हे दाखवून दिले. 'कोकणात आलेल्या निर्सग' चक्री वादळामुळे खूप मोठे नुकसान झाले. शासनाने यासाठी भरीव मदत केली. तत्काळ मदतकार्य लोकांपर्यंत पोहचविले. मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांनी आपत्तीच्या काळात वेग देऊन जनतेला दिलासा दिला. कोकण थांबले नाही आणि थांबणारही नाही. हे करुन दाखविले.

महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षभरात अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले. केवळ सांगितलेच नाही तर, करुन दाखविले. आरोग्याच्या बाबतीत वर्षभरात घेतलेल्या निर्णयांची पावती जनेतला मिळाली. कोरोना काळात सर्वात आवश्यक होते ते सॅनिटायझर याची मागणी वाढली आणि वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अल्कोहोल उत्पादक (डिस्टिलरीज) यांना एक दिवसात परवाना मंजूर करण्याचा निर्णय घेतला आणि तो अंमलात देखील आणला. योग्य किमतीत अन्न पदार्थ मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील, यासाठी सर्व उत्पादक व वितरकांच्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यालय व जिल्हास्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे रुग्णांसाठी ऑक्सिजन कमी पडू नये व रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून राज्यातील इच्छुक ऑक्सिजन उत्पादकांना तत्काळ परवाना मंजूरी देण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन घाऊक वितरक, दहा किरकोळ औषध विक्रेत्यांकडे खासगी व्यावसायिकांसाठी माफक दरात पीपीई किट व एन-९५ मास्क किंवा त्या दर्जाचे इतर मास्क उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आले. कोविड-१९ प्रादुर्भाव काळात लक्षणीय कामगिरी. अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष. जनतेच्या, रुग्णांच्या तक्रारी नोंदवून तत्काळ चौकशी करण्याची व्यवस्था केली. टाळेबंदी काळात राज्यातील सर्व दुकानांमध्ये जीवनावश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, याची यशस्वी खबरदारी घेतल्यामुळे लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा कमी पडला नाही. कोविडसाठी लागणारे रेमेडिसिवीर जनऔषधी केंद्रावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला यामुळे हजारो लोकांचे प्राण वाचले. कोकण विभागात आरोग्य व्यवस्थेने अत्यंत चांगले कार्य केले त्यामुळे कोरोनावर प्रतिबंध करण्यात यश मिळाले.

शासनाची महत्वकांक्षी योजना म्हणजे शिवभोजन योजना होय. २६ जानेवारी २०२० पासून शिवभोजन योजना सुरू झाली. शिवभोजन थाळीचा दर शहरी भागात ५० व ग्रामीण भागात ३५ रुपये असा निश्चित करण्यात आला. सुरुवातीला ग्राहकाला १० रुपये प्रतिथाळी याप्रमाणे जेवण उपलब्ध करून दिली. हे दहा रुपये व शहरी भागासाठीचे ४० व ग्रामीण भागासाठीचे २५ रुपये प्रति थाळीची उरलेली रक्कम शासनामार्फत अनुदान म्हणून शिवभोजन केंद्रांना वितरित करण्यात आली. गरीब आणि कष्टकरी जनतेला यामुळे शासनाविषयी विश्वास निमार्ण झाला. शासन आपल्यासाठी आहे. ही भावना शिवभोजन केंद्रात लाभ घेणाऱ्या अनेकांच्या मनात आहे. राज्यात ९०७ शिवभोजन केंद्रे सुरू आहेत. ७ नोव्हेंबर पर्यंत २ कोटींपेक्षा जास्त नागरिकांनी योजनेचा लाभ घेतला. शासनाने शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नधान्य साठवण्यासाठी ३१,३२० मे.टन क्षमतेच्या २१ नवीन गोदामांना मान्यता दिली. आणि सुमारे ५१ कोटी रुपयांचा निधीही वितरित करण्यात आला.

शासनाने अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी महत्वपूर्ण निर्णय वर्षभरात घेतले. राज्यात शासनाने सर्व धर्मीयांना समान न्याय दिला. अल्पसंख्यांक समाजातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना बचतगटाच्या माध्यमातून संघटित करून उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत ५ वर्षाची मुदत वाढ देण्यात आली. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ८ हजार ८०० महिलांचे संघटन करून ८०० बचत गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सध्या कार्यरत असलेल्या ३ हजार २०० बचतगट व नव्याने स्थापन होणाऱ्या ८०० बचत गटातील सदस्यांना कौशल्य वृद्धीचे प्रशिक्षण, त्यांची बँकांशी जोडणी व कर्ज उपलब्धता करून देऊन बचत गटांच्या उपक्रमांना चालना देण्याचा निर्णय घेतला. अल्पसंख्यांक समाजाचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढवण्याकरिता युपीएससी स्पर्धापरीक्षा प्रशिक्षण योजना. प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांच्या विद्या वेतनात २ हजारांवरून ४ हजार रुपये इतकी वाढ केली. वक्फच्या जमिनी, मालमत्ता कवडीमोल दराने भाड्याने देण्यास आळा घातला. आणि मुंबईतील एका वक्फ मालमत्तेच्या भाड्यात अडीच हजारावरून २.५५ लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यास मान्यता. देण्यात आली. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून १६८ मदरसांना शिक्षकांच्या मानधनासाठी २.३१ कोटी रुपये वितरित करण्यात आले. राज्यातील शासकीय आणि खासगी ८४ आयटीआय मध्ये ८ हजार ३४८ अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची सोय केली. अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यात २३ ठिकाणी शैक्षणिक संकुलांमध्ये वसतिगृहे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला. पोलीस भरतीच्या तयारीसाठी अल्पसंख्यांक तरुणांसाठी विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण योजना लागू केली. याचा फायदा कोकण विभागात अधिक झाला.

कोकणाच्या सागरी संसाधनांच्या सुयोग्य वापरासाठी महाराष्ट्र ओशन अप्लॉईड सायन्सेस युनिव्हर्सिटी रत्नागिरी येथे स्थापन करण्यासाठी समिती गठित करण्यात आली. याचा लाभ संपूर्ण कोकणाला होईल. आजी माजी सैनिकांच्या पाल्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ५ टक्के आणि कमाल ५ जागांची अट रद्द करून एकूण प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या. केंद्र शासन सेवांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. भविष्यात कोकणातील अनेक तरुण भारतीय प्रशासकीय सेवेत असतील. छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती तसेच लोकमान्य टिळक चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला. अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व कोविडमुळे बाधित झालेल्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या सत्रातील कामगिरी आणि अंतर्गत मूल्य मापनाच्या आधारे प्रवेश देण्यात आला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइन, मिश्र पद्धतीने सुरळीतपणे पार पाडण्यात आल्या.

सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत कृषी व अन्न प्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांच्या गुंतवणूक निकषांमध्ये बदल केला. त्यानुसार राज्यातील आरक्षित जिल्ह्यातील उद्योगांना ११० टक्के, मराठवाडा, विदर्भ, धुळे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग मधील उद्योग घटकांना १०० टक्के व उर्वरित महाराष्ट्रातील ड/ड+ तालुक्यांमधील उद्योगांना १०० टक्के व उर्वरित तालुके जे अ/ब/क प्रवर्गात येतात त्यांच्या कृषी आधारित व अन्न प्रक्रिया उद्योगांशी संबंधित प्रकल्पांना भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेत अनुक्रमे ५० टक्के व ७५ टक्के प्रोत्साहन देण्याचा निर्णय झाला. एक खिडकी योजनेद्वारे मैत्री' मार्फत या वर्षामध्ये ५१,७०० ना-हरकत प्रमाणपत्रे / परवाने देण्यात आले. उद्योग घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत या वर्षी २ हजार ६०० कोटी रुपये वित्तीय भांडवल व इतर प्रोत्साहने देण्याची लक्षणीय कामगिरी केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उद्योगांसाठी प्लग ॲण्ड प्ले' सुविधा तयार करुन गाळे उपलब्ध करुन देण्यात आले. मोठ्या गुंतवणुकदारांना त्यांचे उद्योग सुरू करण्यासाठी उद्योगमित्र' संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला. यामुळे उद्योग वाढीसाठी भविष्यात कोकण विभागात चालना मिळेल. पर्यटनासोबत कोकणात उद्योग वाढीस लागतील. स्थानिकांना यामुळे नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

निसर्ग चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या महावितरणाच्या पायाभूत सुविधांची पुनर्स्थापना विक्रमी वेळेत पूर्ण करण्याचा पायंडा या काळात झाला. रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील वीज मिळण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. फळपीक विमा योजनेत यावर्षी २.४३ लाख शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानी पोटी ७१९ कोटी रुपये विमा रकमेचे वाटप करण्यात आले. पीक विमा सुलभी करणासाठी मोबाइल ॲप' निर्माण करुन शेतकऱ्यांना अधिक सोपे तंत्रज्ञान उपलब्ध झाले. फळपीक विमा योजनेत पहिल्यांदा स्ट्रॉबेरीचा समावेश शासनाने केला. कोकण विभागात रानभाज्यांना मोठी मागणी आहे. पारंपारिक भाज्या रोजच्या आहारात खाल्या जातात. मात्र यंदा शासनाने रानभाज्यांचा महोत्सव' भरुन विशिष्ट मर्यादेत भाज्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबरोबरच जनतेला नवीन भाज्यांची माहिती करुन दिली. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात या महोत्सावाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यामुळे राज्यभरात सुमारे ९६ प्रकारच्या भाज्यांच्या प्रकारांची नोंद करण्यात आली हे विशेष होय. यातून सुमारे १४ लाख रुपयांची उलाढाल आणि ११९ ठिकाणी रानभाज्या विक्री सुविधा निर्माण करण्यात शासन यंत्रणेला यश आले.

लॉकडाऊन काळात मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर येथील सुमारे ५३० बांधकामांच्या ठिकाणी अडकलेल्या ८२ हजार कामगारांना भोजनाची सोय करण्यात आली. जिल्ह्या- जिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाइन रोजगार मेळावे व इतर उपक्रमांमधून जानेवारी ते ऑक्टोंबर २०२० पर्यंत राज्यात १ लाख ४८ हजार ३४३ बेरोजगारांना मिळाला रोजगार. महास्वयम वेबपोर्टलवर उद्योजक व उमेदवारांसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. उमेदवारांना रोजगारासंबंधी ऑनलाइन समुपदेशन. ५ हजार प्रशिक्षण केंद्रांचे महास्वयम पोर्टलवर जीआयएस मॅपिंग करण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षण केंद्राची अचूक व वास्तविक माहिती मिळणे शक्य झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या सुमारे १० हजार ८१५ युवकांच्या याद्या कोविड-१९ कालावधीत सर्व आयुक्त, मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी-जिल्हा परिषद यांना नियुक्तीसाठी सुपुर्द केले आणि त्यांचा खूप चागंला उपयोग झाला. रायगड जिल्ह्यातील माणगांव येथे विभागीय क्रीडा संकुल आणि प्रशिक्षण केंद्र उभारणीसाठी निधी आणि जमिनी उपलब्ध करुन देण्यात आली. शासनाने संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतर राष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

कोकणातील खार जमिन विकासाचा प्रश्न अनेक वर्ष प्रलंबित होता. शासनाने वर्षभरात यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले त्याचा फायदा कोकण विभागाला झाला. त्यात नारवेल, ता. पेण, जि. रायगड, काचलीपीट ता. अलिबाग, जि.रायगड आणि पालघर येथील खार भूमी योजनांची कामे सुरू झाली. हे काम दिड वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यामुळे २ हजार ५२ हेक्टर क्षेत्रात पुनर्वापर होणार आहे. याशिवाय पालघर जिल्ह्यातील कोल व बापानेता, वसई योजनांच्या नुतनीकरणाची कामे सुरू केली. माणकुले, सोनकोठा, हाशीवरे या तीन योजनांची कामे दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन केले. यामुळे ९१८ हेक्टर क्षेत्रात पुनर्वापर होणार आहे. याशिवाय शासनाने गृहनिर्माण, जलसंपदा व लाभ क्षेत्रविकास, ग्रामविकास, गृह, नगरविकास, नियोजन, पणन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल, परिवहन, पर्यटन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, फलोत्पादन, मत्स्यव्यवसाय, बंदरे, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन, मराठी भाषा, महसूल, महिला व बालविकास, माहिती तंत्रज्ञान, मृद् व जलसंधारण, राज्य उत्पादन शुल्क, रोजगार हमी, वने, वित्त, विधी व न्याय, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, संसदीय कार्य, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, सहकार, सामान्य प्रशासन, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम या क्षेत्रातही भरीव कामे शासनाने केली आहेत.

पर्यटनाला चालना देण्यासाठी समुद्रकिनारी आनंद कुटी (बीच सॅक्स)उभारण्याचा निर्णय झाला. या निर्णयामुळे गोव्याकडे जाणारे पर्यटक कोकणाकडे आकर्षित होतील. काजूपासून तयार होणाऱ्या फेणीला कर सवलतीचा निर्णय आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पाजवळ ईको टुरिझम' प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. कोकणातील मच्छीमारांच्या डिझेल अनुदानासाठी ५ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. समुद्राच्या लाटांपासून वीज निर्मितीसाठी संशोधन सुरु केले आहे. मांडवा ते अलिबाग रस्त्याच्या कामाला गती दिली आहे. भाऊचा धक्का ते मांडवा रो- रो सेवा सुरु करुन पर्यटनाला चालना दिली आहे. रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात पर्यटक वाढावेत यासाठी पायाभूत सेवांची निर्मिती करण्यात आली आहे. कोकणात अतिवृष्टी, निसर्ग चक्रीवादळ, आणि कोरोना सारखे महाभयंकर संकट येऊनही कोकण थांबला नाही आणि पुढेही थांबणार नाही. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी २८ नोव्हेबर २०१९ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ३३ मंत्री आणि १० राज्यमंत्री यांनी शपथ घेऊन कामकाज सुरु केले होते. आज बरोबर एक वर्ष पूर्ण होत आहे. गेल्या वर्षभरात महाराष्ट्र आणि विशेषत: कोकणासाठी शासनाने घेतल्या महत्वपूर्ण निर्णयाची दिशा स्पष्ट झाली आहे. स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या संवर्धनसाठी २० कोटी रुपये निधी देऊन सरकारने कामाची सुरुवात केली होती. आज वर्षभराचे सिंहावलोकन केले असता महाराष्ट्र आणि कोकण विभागासाठी शासन विश्वासार्ह, पारदर्शक दमदार वाटचाल करीत असल्याचे चित्र दिसून येते. हे खूप आशादायक चित्र आहे.

- डॉ. गणेश व. मुळे
उपसंचालक (माहिती)
कोकण विभाग, नवी मुंबई

भिवंडीहून दिल्ली, कोलकत्तापर्यंतही रेल्वे पार्सल सेवा सुरू करणार

मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक शलभ गोयल यांची माहिती

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी रोड रेल्वे स्थानकातील पार्सल सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, आता व्यावसायिकांनी मागणी केल्यास अमृतसर, कोची, अर्नाकुलम, कोलकत्ता, सिलिगुडी, दिल्ली येथेही पार्सल सेवेद्वारे माल पाठविण्याची व्यवस्था केली जाईल, अशी माहिती मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक शलभ गोयल यांनी आज येथे दिली. त्याचबरोबर गरजेनुसार बांगलादेशातही पार्सलद्वारे माल निर्यात करण्याबाबत विचार करता येईल, असे गोयल यांनी सांगितले.

भाजपाचे खासदार कपिल पाटील यांच्या मागणीनुसार रेल्वे मंत्री पियूष गोयल यांनी भिवंडी रोड रेल्वे स्थानकातून १ सप्टेंबरपासून पार्सल सेवा सुरू केली होती. या सेवेला व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यावसायिकांकडून कोट्यवधी रुपयांचा माल स्वस्त दराने व वेगाने पाठविता आला. या पार्श्वभूमीवर सेवेत आणखी सुधारणा करण्यासाठी व्यावसायिकांच्या सुचना व अडचणी जाणून घेण्यासाठी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक शलभ गोयल यांच्याबरोबर रांजणोली येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी श्री. गोयल बोलत होते. या वेळी खासदार कपिल पाटील यांचीही उपस्थिती होती.

भिवंडी रोड स्थानकातील पार्सल सेवेच्या माध्यमातून रेल्वेला चांगला नफा झाला. सध्या शालिमार, गुवाहाटी, आजरा, पाटणा येथे माल पाठविला जात आहे. त्यातून व्यावसायिकांचा वेळ व पैशांचीही बचत झाली. यापुढे व्यावसायिकांनी मागणी केल्यास, अमृतसर, कोचीन, अर्नाकुलम, कोलकत्ता, सिलीगुडी, दिल्ली येथेही पार्सल सेवा सुरू करता येईल. इतकेच नव्हे तर व्यावसायिकांना बांगलादेशला माल निर्यात करायचा असेल, तर तेथेही माल पाठविण्याचा रेल्वे विचार करेल, असे श्री. शलभ गोयल यांनी सांगितले.

भिवंडी शहराची पूर्वी मिनी मँचेस्टर अशी ओळख होती. मात्र, कालांतरात ती पुसली गेली. मात्र, जुनी ओळख पुन्हा निर्माण करण्यासाठी रेल्वेकडून संपूर्ण सहकार्य केले जाईल, असे गोयल यांनी सांगितले. खासदार कपिल पाटील यांच्या मागणीवरून सुरू झालेल्या पार्सल सेवेतून रेल्वेला मोठा नफा झाला. याबद्दल श्री. गोयल यांनी खासदार कपिल पाटील यांचे आभार मानले. भिवंडी रोड रेल्वे स्थानक अत्याधुनिक व सर्व सोयींयुक्त करण्याची विनंती खासदार कपिल पाटील यांनी केली. रेल्वे पार्सल सेवेमुळे भिवंडीहून गुवाहाटीला अवघ्या ५० तासांत माल पोचत आहे. यापूर्वी तो रस्त्याने पाठविण्यासाठी तब्बल २४० तास लागत होते. त्यामुळे रेल्वेची ही पार्सल सेवा नसून स्पीड पार्सल सेवा आहे, असे मत खासदार पाटील यांनी व्यक्त केले. या सेवेमुळे पर्यावरणाचे संरक्षणही होण्यास मोलाची मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कातकरी समाजाचे स्थलांतर थांबवण्यासाठी विटभट्टी योजने अंतर्गत अनुदान योजना मंजूर

पालघर/प्रतिनिधी

जिल्ह्यातील कातकरी ही आदिम जमात असुन कातकरी समाज हा अती मागासलेला असुन रोजगारासाठी व कुंटुबांच्या उदरनिर्वाहासाठी स्वताचे गाव सोडून शहराकडे कामकरण्यासाठी विटभटटीकाम करण्यासाठी स्थलांतर होत असतो, त्यामुळे त्याचे जिवनमान उंचावणे व शैक्षणिक प्रगती यामध्ये बाधा येते. सन २०१८-१९ या वर्षासाठी आदिम जमाती संरक्षण तथा विकास अंतर्गत जमातीचे स्थलातर रोखण्यासाठी आदिवासी विकास विभागाने आदिम जमातीच्या बचत गटांना विटभटटी व्यवसायाकरिता १० लाख रुपयांचे आर्थिक् सहाय्य करण्याबाबत योजना मंजुर करण्यात आली आहे. प्रकल्प कार्यालय डहाणू अंतर्गत डहाणू, तलासरी, पालघर व वसईचा अंर्तभाव असुन कातकरी कुंटूबांचे उत्पन्न वाढी करता त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे व शैक्षणिक प्रगती करिता सामुहिक स्वरुपात बचत गटांना रोजगार मिळण्याकरिता १० लाख रुपये विटभटटी योजना राबविण्यासाठी मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. प्रकल्प कार्यालय डहाणू अंतर्गत ७ बचत गटांची निवड करण्यात येऊन योजना राबविण्याबाबत मार्गदर्शन व योजना सुरु करण्यासाठी योजनेचा पहिला हप्ता प्रती बचत गट रु. १,५०,०००/- बंचत गटांना प्रकल्प अधिकारी यांच्या हस्ते दिनांक १९/११/२०२० रोजी सुपूर्त करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या वेळी प्रकल्प अधिकारी यांनी कातकरी समाजाचा विटभटटी या व्यवसायातील विधि अनुभव व कामात निपुण असल्यामुळे त्यांचे कडुन हि योजना चांगल्या प्रकारे राबविली जाईल अशी आशा व्यक्त केली. तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी योजना राबविताना घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन केले. सदर योजनेमुळे कातकरी समाजाचे स्थलांतर रोखण्यास मदत होईल त्यांच्या राहणीमानाचा दर्जा वाढण्यास मदत होईल जेणेकरुन त्यांची मुले शिक्षणाच्या मुळ प्रवाहात येतील.

जमीन विकणे आहे

विजयकुमार रामचंद्र पाटील राहाणार : लिंबाळा, ता. निलंगा, जि. लातूर यांच्या मालकीची वहिवाट असलेली सर्व्हे नंबर ११ व १२ मधील २० एकर जमीन योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

संपर्क मोबाईल नंबर
९०७०७०५५९९

रिपाईच्या वतीने देवणीत संविधान दिन साजरा

देवणी : २६ नोव्हेंबर २०२० रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ) ता.देवणी जि.लातूर च्या वतीने ७१वा संविधान दिन देवणी येथील जनसंपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. यावेळी रिपाइं देवणी तालुका अध्यक्ष विलास वाघमारे,रिपाइं सोशल मिडिया जिल्हा उपाध्यक्ष गणेशभाऊ कांबळे दवणहिप्परगेकर, प्रेस संपादक संघाचे देवणी तालुका अध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, धनराज गायकवाड, विक्रम गायकवाड, गोविंद हणमंते, रोहित डोंगरे, विठ्ठल गायकवाड, महेश मोदाळे, अविनाश मादळे, चाँदपाशा बौडीवाले, नजीर बौडीवाले, पप्पू बनसोडे आदी रिपाइं कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

उस्मानबीन अफ्फान दिनी मदरसामध्ये वृक्ष रोपण

अहमदपूर/तौसिफ सय्यद

अहमदपूर येथील ऑल इंडिया तहेरिक-ए-खुदादाद संघटनेच्या वतीने शहिद टिपू सुलतान यांच्या २७१वी जयंती निमित्त उस्मानबिन अफ्फान मदरसामध्ये वृक्ष रोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पंचायत सिमीतीच्या माजी सभापती अयोध्याताई अशोकराव केंद्रे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते ॲड. सचिन केन्द्रे, मौलाना नाजीमसहाब, मौलाना इब्राहिमसहाब, शेख अय्याज, पठाण मुजीब सर, शेख अब्दुल्ला सर, मेहराज सर, अकबर सर, शेख अन्वर, सय्यद दाऊद, सय्यद सिराज, सय्यद शाहीद आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन तहेरीक-ए-खुदादादचे जिल्हाध्यक्ष सय्यद तबरेज अली, शेख मतीन यांनी केले होते.

30 NOV TO 06 DEC 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 28/11/2020 8:49 PM Page 1

पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी सदैव कटिबद्ध -मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

मुंबई/प्रतिनिधी

सण, उत्सव असो वा सभा असो जमलेल्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आमचे पोलीस चोवीस तास कर्तव्य बजावत असतात. स्वत:च्या कुटुंबातील, घरातील सुख दु:ख बाजूला ठेवून जनतेच्या सुख दु:खात सामिल होणाऱ्या आमच्या पोलिसांचा मला अभिमान आहे. पोलीस विभागाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन सदैव कटिबद्ध असून त्यांच्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते सर्व करणारच आणि हे वचन आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्र पोलीस महासंचालनालयात आयोजित हुतात्मा दालन उद्घाटन व कॉफी टेबल बुक प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी गृहमंत्री अनिल देशमुख, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, शौर्याला वंदन करण्यासाठी आपण या ठिकाणी जमलो आहोत. २६ नोव्हेंबर हा शौर्यदिन. या दिनी शहीद झालेल्या सर्व शूरवीरांना वंदन व नतमस्तक. हा दिवस आपण विसरू शकत नाही. त्या दिवशी मी मुंबई बाहेर होतो. मुंबईतील घटना कळताच प्रथम विजय साळसकरांना फोन लावला. घटनेची माहिती देताना साळसकरांनी सांगितले की, मी आता घरी असून लगेचच घटनास्थळी जात आहे. काही वेळानी मी त्यांना फोन लावला, पण तो फोन उचलला गेलाच नाही आणि ती दुर्दैवी घटना घडली. बारा वर्ष झाली, यापुढेही कित्येक वर्ष उलटतील, पण काळजावर झालेली ही जखम कधीही भरून येणार नाही. अगदी नक्षलवादी अतिरेक्यांपासून ते भुरट्या चोरांपासून सर्वांना पकडणारा हा आमचा पोलीस एक महत्वाचा घटक आहे. तो सुदृढ राहिलाच पाहिजे, त्याला सुदृढ ठेवणे हे आमचे कर्तव्य आहे. यापुढे अतिरेकी महाराष्ट्र, मुंबईवर हल्ला काय पण मुंबईचे नाव पण घेऊ शकणार नाहीत, त्यांना धडकी भरेल असे आपण पोलीस दलाचे भक्कम सक्षमीकरण करू.

पोलिसांची कामे ही जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याकरिता अशा हुतात्मा दालनाची संकल्पना मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी तसेच महाराष्ट्रात सर्वत्र राबविण्यात यावी. देश-विदेशातही पोलीस व लष्करी प्रशिक्षणाची व्यवस्था शालेय जीवनापासून आहे, असे सांगतांना त्यांनी सिंगापूरचे उदाहरण दिले. पोलिसांवरील हल्ला ही अत्यंत चुकीची बाब असून ...पान ६ वर

शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी तत्परतेने मदत करणार -लक्ष्मणराव मोरे

देवणी/शकिल मनियार

जागृती साखर कारखाना व लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी सर्व प्रकारची मदत तत्परतेने केली जाईल. ऊस लागवडीसाठी आर्थिक मदत, ट्रॅक्टर खरेदी, शिल्लक ऊस असे प्रश्न सोडवणे व इतर सर्व प्रकारच्या कृषीविषयक साहित्याच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना तत्परतेने मदत केली जाईल, असे प्रतिपादन जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्हा. चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी केले. भोपणीकर परिवाराच्यावतीने कै.रसिका महाविद्यालय देवणी येथे दीपावलीनिमित्त घेण्यात आलेल्या 'स्नेहमेळावा' कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी देवणी तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन व सदस्यांचा आणि देवणी तालुक्यातील इतर प्रतिष्ठित मान्यवरांचा सत्कार लक्ष्मणराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर गोविंदराव भोपणीकर, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज शिरसाठ, गजानन भोपणीकर, व्यंकटराव पाटील वलांडीकर, अनंत पाटील टाकळीकर, बालाजी बोबडे यांची उपस्थिती होती. ...पान ६ वर

मा. प्रथम महिला महापौर प्रवीणा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू महिलांसाठी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत कागदी पिशवी बनविण्याचे प्रशिक्षण

विरार/प्रतिनिधी

बहुजन विकास आघाडीचे लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर, प्रथम महापौर राजीव पाटील, युवा आमदार क्षितिज ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटक सचिव मा.नगरसेवक अजीव पाटील, मा.स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, श्रीकृष्ण जन्मोत्सव मंडळ यांच्यावतीने मा.प्रथम महिला महापौर प्रविणा हितेंद्र ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मनवेलपाडा विभागातील गरजू महिलांसाठी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत क्लीन ऑर्बिट ग्रुप ऑफ कंपनी संचालक दिनेश मेस्त्री यांच्या सहकार्याने कागदी पिशवी बनवणे प्रशिक्षण व कच्चामाल वाटप शुभारंभ तसेच मनवेलपाडा विभागातील विविध गृहसंकुले यामध्ये गृह सेविकेचे काम करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावणाऱ्या मनवेलपाडा विभागातील रहिवासी महिलांना धान्य वाटप करताना युवा आमदार क्षितीज ठाकूर, संघटक सचिव, मा.नगरसेवक अजिव पाटील, मा.स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, मा.नगरसेवक हार्दिक राऊत, मा.नगरसेविका मीनल पाटील, चिरायू चौधरी, संगीता भेरे, हेमांगी पाटील, रजनी पाटील व महिला मंडळ कार्यकर्त्या, महिला बचत गट सदस्य, विभागीय कमिटी सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

भिवंडीत महिला वनधिकाऱ्यांना धक्काबुक्की करून ठेवले डांबून

भिवंडी/प्रतिनिधी

तालुक्यातील राहुर या गावात चार दिवसांपूर्वी यासिन चिखलेकर आणि त्याच्या भावानं नंग्या तलवारी घेऊन तिघांवर वार केले होते. ही घटना ताजी असतानाच या तलवारबाजांनी महिला वनअधिकारीला धक्काबुक्की करत फार्महाऊसमध्ये डांबल्याची माहिती समोर आली आहे. महिला वनअधिकारीसह काही कर्मचाऱ्यांनी यासिन चिखलेकर याच्या फार्म हाऊसवर छापा टाकला. दोन ट्रक खैर जप्त केले. मात्र, यासिन चिखलेकर यांनी आपले साथीदार आणि कुटुंबीयांच्या १३ मदतीनं महिला अधिकाऱ्यांसह वन कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली. शिवीगाळ करत फार्म हाऊसमध्ये डांबून ठेवलं. फार्म हाऊसच्या गेटला कुलूप लावून त्यांच्यावर कुटुंबातील महिलांना पाळत ठेवण्यास सांगितलं.

वेळीच पडघा पोलिसांनी घटनास्थळी घाव घेऊन महिला अधिकारीसह वन कर्मचाऱ्यांची सूटका केली. पोलिसांनी कुलूप तोडून वन अधिकाऱ्यांची सुटका केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून या प्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात यासिन चिखलेकर याच्या १३ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र सर्वजण फरार झाले आहेत. पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे. यासिन याच्यावर खैर, साग, चंदनाची तस्करी करत असल्याचा आरोप आहे. त्याचबरोबर पोलिस, वनअधिकारी आणि नागरिकांना मारहाण असे त्याच्याविरोधात १५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहे. यासिन याची या परिसरात मोठी दहशत असल्याचं समजते. त्यामुळे त्याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, महिला अधिकारीसह वन कर्मचाऱ्यांना यासिन चिखलेकर यांनं आपल्या फार्म हाऊसवर डांबून ठेवल्याची माहिती मिळाली. तातडीनं पोलिस घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी याचिनच्या कुटुंबीयांना समज दिली. मात्र, ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर पोलिसांनी गेटचं कुलूप तोडून महिला वन अधिकारीसह कर्मचाऱ्यांची सुटका केली.पोलिसांनी आरोपींच्या घरी जाऊन त्यांचा शोध घेतला. पण ते आढळून आले नाही, सर्व आरोपी गुजरातला फरार झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. पोलिसांची पथके तयार करण्यात आली असून आरोपींना लवकरच अटक करू, असं पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश कटके यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, भिवंडी तालुक्यातील राहूर या गावात यासिन चिखलेकरसह त्याच्या भावानं गेल्या आठवड्यात खुलेआम नंग्या तलवारी हाता घेऊन तिघांचा पाठलाग केला होता. त्यांच्यावर वार केले होते. यात वडिलांसह दोन मुले जखमी झाले होते.या प्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात तलवारबाज यासिन चिखलेकर, हजर चिखलेकर या दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन नंतर सोडून दिलं होतं.परिसरात पुन्हा दहशत पसरली असून या ...पान ६ वर

वीजवितरणच्या कार्यालयासमोर वाढीव वीज बिलाची केली होळी

वाडा/प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या वतीने लॉक डाऊन काळातील विजेचा वापर कमीप्रमाणात असतानाही महावितरण कपंनी कडून भरमसाठ वाढीव बिले दिली गेली आहेत. अगोदरच कोरच्या पार्श्वभूमीवर गरीब जनता मेटाकुटीला आलेली असताना वाढीव बिले देऊन सरकार कडून नागरिकांची पिळवणूक होत असल्याचे सांगत सोमवारी(दि.२३) वाडा वीज वितरण कंपनीच्या कार्यालया समोर वीज बिलांची होळी करून आघाडी सरकारच्या निषेधार्थ घोषना देत आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी वाडा तालुका अध्यक्ष मंगेश पाटील ...पान ६ वर

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विस्तारीत रुग्णालय सक्षम -पालकमंत्री दादाजी भुसे

वसई/प्रतिनिधी

वसई व परीसरातील नागरीकांना १८६० पासुन हे रुग्णालय सेवा देत असून या इमारतीचे नुतनीकरण करण्यात येणार असून हे रुग्णालय आरोग्याच्या कोणत्याही समस्यांशी लढण्यासाठी सक्षम असल्याचे . पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. यावेळी जि. प. अध्यक्षा भारती कामडी, माविम अध्याक्षा ज्योती ठाकरे, खासदार राजेंद्र गावित, सर्वश्री आमदार रविंद्र फाटक, क्षितिज ठाकूर, श्रीनिवास वनगा, माजी महापौर प्रविण शेट्टी, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त गंगाथरन. डी तसेच शासकिय अधिकारी व नागरिक उपस्थित होते. कोरोना महासंकटाच्या काळात वैद्यकिय क्षेत्राने उल्लेखनिय काम केले आहे. या ईमारतीच्या नुतनीकरण केल्याने १०० खाटांचे रूग्णालय जिल्ह्यासाठी उपयोगाचे ठरणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. नागरिकांनी कोरोनाला दुर ठेवण्यासाठी माझे कुटुंब माझी जबाबदारी या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या जनजागृती नुसार प्रबोधन केलेल्या बाबींचे काटेकोरपणे पालन करावे असे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. पालघर जिल्ह्याची सिमा गुजरात राज्याला लागून असल्याने जिल्ह्यातील सिमा भागातील प्रवेश द्वारावर दहा टिम तयार करण्यात आल्या आहेत. या दहा टीम च्या माध्यमातून चेक पोस्टवर राज्यात येणाऱ्या नागरिकांची तपासणी करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. वसई व परिसरातील कोरोना रुग्णांवर उपचार करणारे कोरोना योद्धा डॉ.हेमंत पाटील यांना पालकमंत्री दादाजी भुसे यांनी श्रध्दांजली वाहीली.

बहुजन विकास आघाडी पुरस्कृत श्रीकृष्ण जन्मोत्सव मंडळ मनवेलपाडा आयोजित २६/११च्या शहीद वीर जवान श्रद्धांजली कार्यक्रमात श्रद्धांजली अर्पण करताना युवा आमदार क्षितिज ठाकूर, सोबत संघटक सचिव मा.नगरसेवक अजीव पाटील, मा.स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, मा.नगरसेविका मीनल पाटील, चिरायू चौधरी, संगीता भेरे, हेमांगी पाटील, रजनी पाटील व महिला मंडळ कार्यकर्त्या व कार्यकर्ते उपस्थित होते.

बविआतर्फे माता बालसंगोपण केंद्रातील मातांना फळे वाटप

वसई/प्रतिनिधी

वसई-विरार शहर महापालिकेच्या प्रथम महिला महापौर प्रविणाताई हितेंद्र ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त माता बालसंगोपण केंद्र सातिवली या ठिकाणी फळं वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. बविआचे सक्रिय कार्यकर्ते व वालीव विभागाचे प्रवक्ते रणधीर जी.कांबळे यांनी आपल्या लोकनेत्या यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माता बालसंगोपण केंद्र सातीवलीया ठिकाणी डॉ.विनय सर व त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत माजी खासदार बळीराम जाधव साहेबांचे हस्ते बाळंत झालेल्या माता भगिणींना फळं वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी वालीव प्रभागाचे माजी सभापती रमेश घोरकना, माजी सभापती कन्हैया भोईर, नगरसेविका शकुंतला शेळके, माजी जि.प.सदस्या आशाताई जाधव, माजी ग्रा.पं.सदस्या लता रणधीर कांबळे तसेच नागेश शेळके, विनय कांबळे, रूपेश जाधव, मफतअल्लीभाई, सुरज उपाडे, दया उपाडे, राधेश्याम, शोभाताई गवळी, अपर्णाताई पाटील, ताई गालफाडे, कल्पना परेल व अनेक कार्यकर्ते ही उपस्थित होते.

लातूर शहरातील ओल्या कचऱ्यापासून बनतेय खत

लातूर/प्रतिनिधी

लातूर शहराला कचरामुक्त करण्यासाठी महानगरपालिका सरसावली आहे. केवळ कचरा गोळा करून कचरा डेपो येथे पाठविण्यावर न थांबता त्यावर सुनियोजित पद्धतीने पक्रिया करण्यावर मनपाच्या वतीने भर देण्यात येत आहे. याकरिता मनपाचे विकेंद्रित पद्धतीने ओल्या कचर्यापासून खत निर्मितीचे चार प्रकल्प शहरात कार्यान्वित करण्यात आले आहेत. या माध्यमातून निम्म्या शहरातील कचरा प्रभागातच कुजवून खत निर्मिती केली जात ...पान ६ वर

देवणी येथे भाजपाकडून वीज बिल होळी आंदोलन

देवणी/प्रतिनिधी

लॉकडाऊनच्या काळात नागरिकांना भरमसाठ प्रमाणावर वीज बिले आली आहेत कोरोना काळात आर्थिक तणावाखाली असलेल्या जनतेला या सरकार ने वाढीव बिल देऊन मोठा शॉक दिलेला आहे याकरीता दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजी सरकारच्या विरोधात देवणी येथील बोरोळ चौकात वीज बिल होळी आंदोलन करण्यात आले.

देवणी तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.व विद्युत महावितरण देवणीचे अभियंता शिंदे याना लॉकडाउन काळात आलेले वाढीव विजबिल माफ करून तालुक्यात होणारा विजेचा लपनडाव बंद करावा उच्च दाबाने वीजपुरवठा करण्यात यावा अशा मागणीचे निवेदनही देण्यात आले. वाढीव वीजबिल माफ करावे या मागणीसाठी तालुका भाजपाने पुकारलेले आंदोलन लक्षवेधक ठरले. या आंदोलनात भाजपाचे तालुका अध्यक्ष काशिनाथ गरिबे, ज्येष्ठ नेते हावगीराव पाटील, मनोहर पटणे, नगराध्यक्ष, वैजनाथ अष्टुरे, बसवराज पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बालाजी बिरादार, शंकरराव पाटील तळेगावकर, भाजयुमो ...पान ६ वर